# RInfra–Transmission (RInfra-T)

Executive Summary (Marathi):

Multi Year Tariff (MYT) Mid Term Review Petition for the Control Period: FY 2012-13 to FY 2015-16

Filed with

Maharashtra Electricity Regulatory Commission

# अनुक्रमणिका


**१. प्रस्तावना....................................................५**

१.१ मध्यावधी पुनरावलोकन (एमटीआर) याचिका सादर करण्यासाठीची पार्श्वभूमी.....५

१.२ एमवायटी एमटीआर याचिकेचे उद्दिष्ट ..........................................५

**२. एटीई निकालांचा परिणाम ..........................................५**

२.१ माननीय एटीईचा निकाल - आयकरासाठी मान्यता.................................५

२.२ माननीय एटीईचा निकाल - नमुनेदार कर्जावरील व्याजाला मान्यता................६

२.३ कॅरिंग कॉस्टसहित एकूण परिणाम ..............................................६

**३. आ.व. १२-१३साठी ट्रुईंग अप..........................................७**

३.१ भांडवली खर्च आणि भांडवलीकरण...............................................७

३.१.१ अर्थसहाय्याची योजना.........................................................७

३.१.२ कर्जाऊ भांडवलावरील व्याज....................................................८

३.१.३ इतर आर्थिक आकार............................................................९

३.१.४ सेवानिवृत्ती.................................................................९

३.१.५ घसारा.......................................................................९

३.१.६ इक्विटीवरील परतावा..........................................................९

३.२ प्रचालन आणि देखभाल (ओ अँड एम) खर्च.........................................१०

३.२.१ एमवायटी नियमावलीनुसार मापदंड...............................................१०

३.२.२ वास्तविक प्रचालन आणि देखभाल खर्च...........................................१०

३.२.३ प्रचालन आणि देखभालीतील कार्यक्षमता नफा/तोटा...............................१०

३.२.४ प्रचालनाशी संबंधित अतिरिक्त खर्च............................................११

३.३ खेळत्या भांडवलावरील व्याज...................................................१२

३.४ आकस्मिकता राखीव निधीसाठी वर्गणी............................................१२

३.५ आयकर.......................................................................१३

३.६ आ.व. १२-१३ साठी महसूल.....................................................१३

३.६.१ आंतरराज्य पारेषणातून प्राप्त महसूल...........................................१३

३.६.२ दरपत्रकाव्यतिरिक्तचे उत्पन्न..................................................१३

३.६.३ आरइन्फ्रा-टी नेटवर्कच्या उपलब्धतेवरील इन्सेंटिव्ह..............................१४
३.७ आ.व. १२-१३साठी महसुलातील तफावत/अधिक्य............................१४

**४. आ.व. १३-१४साठी ट्रूईंग आप..................................१५**

४.१ भांडवली खर्च आणि भांडवलीकरण............................................१५
४.१.१ अर्थसहाय्याची योजना......................................................१६
४.१.२ कर्जाऊ भांडवलावरील व्याज................................................१७
४.१.३ सेवानिवृत्ती..................................................................१७
४.१.४ घसारा.........................................................................१७
४.१.५ इक्विटीवरील परतावा.......................................................१७
४.२ प्रचालन आणि देखभाल (ओ अँड एम) खर्च...................................१७
४.२.१ एमवायटी नियमावलीनुसार मापदंड..........................................१७
४.२.२ वास्तविक प्रचालन आणि देखभाल खर्च......................................१८
४.२.३ प्रचालनाशी संबंधित अतिरिक्त खर्च..........................................१८
४.२.४ प्रचालन आणि देखभालीतील कार्यक्षमता नफा/तोटा...........................१८
४.३ खेळत्या भांडवलावरील व्याज.................................................१९
४.४ आकस्मिकता राखीव निधीसाठी वर्गणी.........................................१९
४.५ आयकर........................................................................१९
४.६ आ.व. १३-१४साठी महसूल....................................................२०
४.६.१ आंतरराज्य पारेषणातून प्राप्त महसूल........................................२०
४.६.२ दरपत्रकाव्यतिरिक्तचे उत्पन्न................................................२०
४.६.३ इतर व्यवसायांपासूनचे उत्पन्न................................................२०
४.६.४ आरइन्फ्रा-टी नेटवर्कच्या उपलब्धतेवरील इन्सेंटिव्ह..............................२०
४.७ आ.व. १३-१४साठी महसुलातील तफावत/अधिक्य............................२१

**५. आ.व.१४-१५साठी एपीआर.......................................२२**

५.१ भांडवल गुंतवणूक योजना....................................................२२
५.१.१ भांडवलीकरणाचे भाकीत......................................................२३
५.१.२ अर्थसहाय्याची योजना......................................................२४

५.१.३ कर्जाऊ भांडवलावरील व्याज....................२४
५.१.४ घसारा....................२४
५.१.५ इक्विटीवरील परतावा....................२५
५.२ प्रचालन आणि देखभाल (ओ अँड एम) खर्च....................२५
५.२.१ प्रचालनाशी संबंधित अतिरिक्त खर्च....................२५
५.२.२ कॉर्पोरेट ॲलोकेशन....................२६
५.३ खेळत्या भांडवलावरील व्याज....................२६
५.४ आकस्मिकता राखीव निधीसाठी वर्गणी....................२६
५.५ आयकर....................२७
५.६ आ.व. १४-१५साठी महसूल....................२७
५.६.१ आंतरराज्य पारेषणातून महसूल....................२७
५.६.२ दरपत्रकाव्यतिरिक्तचे उत्पन्न....................२७
५.६.३ इतर व्यवसायापासूनचे उत्पन्न....................२७
५.७ आ.व. १४-१५साठी महसुलातील तात्पुरती तफावत/अधिक्य....................२८

**६. आ.व. १५-१६साठी वार्षिक महसुलाची आवश्यकता....................२८**

६.१ भांडवल गुंतवणूक योजना....................२८
६.१.१ भांडवलीकरणाचे भाकीत....................२९
६.१.२ अर्थसहाय्याची योजना....................२९
६.१.३ कर्जाऊ भांडवलावरील व्याज....................२९
६.१.४ घसारा....................३०
६.१.५ इक्विटीवरील परतावा....................३०
६.२ प्रचालन आणि देखभाल (ओ अँड एम) खर्च....................३०
६.२.१ प्रचालनाशी संबंधित अतिरिक्त खर्च....................३०
६.२.२ कॉर्पोरेट ॲलोकेशन....................३१
६.३ खेळत्या भांडवलावरील व्याज....................३१
६.४ आकस्मिकता राखीव निधीसाठी वर्गणी....................३२
६.५ आयकर....................३२
६.६ आ.व. १५-१६साठी महसूल....................३२

६.६.१ दरपकाव्यतिरिक्तचे उत्पन्न....................................................३२
६.६.२ इतर व्यवसायापासूनचे उत्पन्न.................................................३२
६.७ आ.व. १२-१३ आणि १३-१४ साठी महसुलातील तफावत/अधिक्य.............३२
६.८ वार्षिक महसुलाची आवश्यकता...............................................३३

# तक्त्यांची सूची

तक्ता १- सारांश - भांडवली खर्च आणि भांडवलीकरण...................................७
तक्ता २- सारांश - वास्तविक प्रचालन आणि देखभाल खर्च...............................१२
तक्ता ३- आ.व. १२-१३साठी ट्रुईंग अप सारांश...........................................१५
तक्ता ४- सारांश - भांडवली खर्च आणि भांडवलीकरण....................................१६
तक्ता ५- सारांश - वास्तविक प्रचालन आणि देखभाल खर्च...............................१९
तक्ता ६- आ.व. १३-१४साठी ट्रुईंग अप सारांश...........................................२१
तक्ता ७- सारांश - भांडवली खर्च आणि भांडवलीकरण....................................२४
तक्ता ८- प्रचालन आाणि देखभाल खर्च...................................................२६
तक्ता ९- आ.व. १४-१५ साठी तात्पुरती महसुली तफावत/अधिक्य.......................२८
तक्ता १०- सारांश - भांडवली खर्च आणि भांडवलीकरण.................................२९
तक्ता ११- प्रचालन आाणि देखभाल खर्च................................................३१
तक्ता १२ - आ.व. १२-१३ आणि १३-१४च्या महसुली तफावतीचा/अधिक्याचा परिणाम..३३
तक्ता १३ - आ.व. १५-१६ साठी वार्षिक महसुलाची आवश्यकता.........................३३

# १. प्रस्तावना

## १.१ मध्यावधी पुनरावलोकन (एमटीआर) याचिका दाखल करण्यासाठी पार्श्वभूमी

माननीय महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने (यानंतर माननीय आयोग/माननीय मविनिआ असा उल्लेख केलेला आहे), त्यांना विद्युत कायदा, २००३च्या कलम ४५(२), ६१ व ६२ आणि त्यासोबत कलम १८१च्या सहवाचनांतर्गत बहाल केलेल्या अधिकारांच्या अंतर्गत ४ फेब्रुवारी, २०११ रोजी महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (बहुवार्षिक दरपत्रक) नियमावली, २०११ जारी केली (यानंतर जिचा उल्लेख एमवायटी नियमावली असा केला आहे). माननीय आयोगाने २०११चे प्रकरण क्रमांक ४५ मध्ये दिलेल्या आदेशानुसार ही नियमावली रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेडसाठी (यानंतर आरइन्फ्रा असा उल्लेख केलेला आहे) आ.व. १२-१३ पासून पुढे लागू करण्यात आली.

आरइन्फ्रा-टीने २०१२च्या प्रकरण १४१मध्ये एमवायटी याचिका दाखल केली, ज्यात आरइन्फ्रा-टीने आ.व. १२-१३ ते आ.व. १५-१६ या कालावधीसाठी वार्षिक महसुलाच्या आवश्यकतेला मंजुरी अपेक्षिलेली आहे. माननीय आयोगाने दिनांक १३ जून, २०१३ रोजी सदरच्या प्रकरणात आ.व. १२-१३ ते आ.व. १५-१६ या कालावधीसाठी वार्षिक महसुलाच्या आवश्यकतेला मंजुरी दिली.

सदरच्या आदेशात माननीय आयोगाने असा निकाल दिला की, आयोग आ.व. १४-१५च्या तिसऱ्या तिमाहीच्या दरम्यान आरइन्फ्रा-टीच्या कामगिरीचे मध्यावधी पुनरावलोकन करील आणि आरइन्फ्रा-टीला मध्यावधी पुनरावलोकनासाठी याचिका दाखल करण्याचे निर्देश दिले.

## १. २ एमवायटी एमटीआर याचिकेचा उद्दिष्ट

वरील अनुषंगाने सध्याची मध्यावधी पुनरावलोकन याचिका आरइन्फ्रा-टीद्वारे सादर केली जात आहे.

मागील कालावधीसाठीची, म्हणजेच आ.व. १२-१३ आणि आ.व. १३-१४ साठीची वास्तविक आकडेवारी आणि नियंत्रण कालावधीतील उर्वरित कालावधीसाठीचे म्हणजेच आ.व. १४-१५ आणि आ.व. १५-१६ साठीचे सुधारित अंदाज यासोबतच माननीय आयोगाच्या मंजुरीसाठी सादर करण्यात येत आहेत. सध्याच्या या याचिकेत माननीय विद्युत अपीलीय न्यायाधिकरणाच्या (माननीय एटीई) विविध निकालांच्या परिणामस्वरूपी देय असलेल्या मागील काळातील खर्चांची वसुलीही त्यांच्यासोबतच्या कॅरिंग कॉस्टसहित समाविष्ट आहे.

# २. एटीई निकालांचा परिणाम

## २.१ माननीय एटीईचा निकाल - आयकरासाठी मान्यता

आरइन्फ्रा-टी ट्रूईंग अप करताना नफ्यावरील/तोट्यावरील आयकराची गणना स्टँड अलोन आधारे करपूर्व निश्चित करीत असते (म्हणजेच नियामक उत्पन्न वजा नियामक खर्च). माननीय आयोगाने २०११च्या प्रकरण क्र. १६७मध्ये दिनांक १७ मे २०१२ रोजी दिलेल्या आपल्या निकालात आरइन्फ्राने कंपनीसाठी आरइन्फ्राच्या निर्मिती, पारेषण

आणि वितरण या नियामक व्यवसायांसहित विविध व्यवसायांसाठी संबंधित त्या-त्या खात्यांतर्गत त्या प्रमाणात भरणा केलेल्या वास्तविक संपूर्ण आयकराला परवानगी देत आ.व. ०९-१० ते आ.व. ११-१२ साठी आयकराला मान्यता दिली होती.

सदरच्या आदेशाला माननीय एटीईसमोल २०१२च्या अपील क्र. १३९ अन्वये आव्हान देण्यात आले होते. माननीय एटीईने दिनांक २ डिसेंबर २०१३ रोजी निकाल जारी केला, ज्यात माननीय एटीईने माननीय आयोगाला स्टँड-अलोनच्या आधारे आयकराचे पुनर्निर्धारण करण्याचा आदेश दिला होता.

या निकालाच्या आधारे, आव. ०९-१० ते आ.व. ११-१२ साठीचा आयकर या याचिकेत पुनर्निर्धारित करण्यात आलेला आहे आणि त्याच्या होणाऱ्या अतिरिक्त परिणामाची गणना केलेली आहे.

## २.२ माननीय एटीईचा निकाल - नमुनेदार कर्जांवरील व्याजाला मान्यता

आरइन्फ्रा-टीने आपल्या २०११च्या याचिका क्र. १६७मध्ये १ एप्रिल २०११ रोजीनुसार नमुनेदार कर्जांवर व्याजाची गणना करीत असताना, आ.व. ११-१२ दरम्यान विचारात घेतलेल्या ताज्या कर्जासोबतच, त्यावेळचे नमुनेदार दर त्यावेळी बाजारातील प्रचलित व्याजदर प्रतिबिंबित होतील अशा प्रकारे सुधारित करण्यासाठी माननीय आयोगाकडे परवागनी मागितली होती.

तथापि, माननीय आयोगाने दिनांक १७ मे २०१२ रोजी २०११च्या प्रकरण १६७मध्ये दिलेल्या निकालात बाजारातील प्रचलित व्याजदरांनुसार मागील कर्जांचे व्याजदर सुधारित करण्याची विनंती विचारात घेतली नाही आणि आपल्या मागील आदेशांनुसार फक्त नमुनेदार व्याजदरांस मान्यता दिली.

सदर आदेशाला आरइन्फ्रा-टीने माननीय एटीईकडे २०१२च्या अपील क्र. १३९ द्वारे आव्हान दिले होते. माननीय एटीईने दिनांक २ डिसेंबर २०१३ रोजी दिलेल्या निकालात माननीय एटीईने माननीय आयोगाला बाजारातील प्रचलित दर विचारात घेण्याचे निर्देश दिले होते.

त्यानुसार, दिनांक १ एप्रिल २०११ रोजीनुसार बाकी  असलेल्या सर्व नमुनेदार कर्जांवरील बाजारपेठेत प्रतिबिंबित झालेले व्याजदर ११.५०% (आ.व. ११-१२मध्ये घेतलेल्या ताज्या नमुनेदार कर्जांसाठी माननीय आयोगाने मान्यता दिलेले व्याजदर) एवढे विचारात घेतलेले आहेत. आणि आ.व. ११-१२साठीच्या व्याजदरांची पुन्हा गणना केलेली आहे.

## २.३ कॅरिंग कॉस्टसहित एकूण परिणाम

आरइन्फ्रा-टीचे असे म्हणणे आहे की, माननीय एटीईच्या निकालाच्या परिणामस्वरूपी असलेली वर उल्लेख केलेल्या मुद्दल रकमेला माननीय आयोगाना दिनांक १५ फेब्रुवारी २०११ रोजी २००९च्या अपील क्र. १७३मध्ये निकाल दिल्यानुसार कॅरिंग कॉस्ट सोबत परवानगी द्यावी. वर उल्लेख केलेल्या दोन बाबींच्या अतिरिक्त परिणामांचा दावा आरइन्फ्रा-टी संबंधित एसबीएआर(स्टेट बँक ॲडव्हान्स रेट) दराने कॅरिंग कॉस्टसह या याचिकेत करीत आहे.

आ.व. १५-१६च्या वार्षिक महसुलाच्या आवश्यकतेत १०.०४ कोटी रुपयांचा निव्वळ परिणाम वसुलीसाठी प्रस्तावित करण्यात येत आहे.

# ३. आ. व. १२-१३ साठी ट्रुईंग अप

या याचिकेत आरइन्फ्रा-टी लेखापरीक्षित हिशेबांच्या आधारे आ.व. १२-१३साठी करण्यात आलेला वास्तविक खर्च आणि प्राप्त केलेला महसूल ट्रुईंग अपसाठी सादर करीत आहे. आरइन्फ्रा-टी माननीय आयोगाला आ.व. १२-१३साठी ट्रुईंग अप करण्याची विनंती करीत आहे.

### ३.१ भांडवली खर्च आणि भांडवलीकरण

आरइन्फ्रा-टीने आ.व. १२-१३मध्ये १०९.३७ कोटी रुपये एवढी रक्कम भांडवली खर्चासाठी खर्च केलेली आहे आणि वास्तविक भांडवलीकरण ४००.७७ कोटी रुपये एवढे झालेले आहे.

आ.व. १२-१३साठी भांडवली खर्चाचा आणि भांडवलीकरणाचा सारांश पुढीलप्रमाणे आहे:

**तक्ता १: सारांश - भांडवली खर्च आणि भांडवलीकरण**

| कोटी रु. | | वास्तविक | एमवायटी आदेश |
|---|---|---|---|
| भांडवली खर्च | डीपीआर | १०१.०५ | - |
| | बिगर-डीपीआर | ८.३२ | - |
| | **एकूण** | **१०९.३७** | **-** |
| भांडवलीकरण | डीपीआर | ३९३.८७ | ४३३.४० |
| | बिगर-डीपीआर | ६.९० | १६.०० |
| | **एकूण** | **४००.७७** | **४४९.४०** |

#### ३.१.१ अर्थसहाय्याची योजना

आ.व. १०-११ पर्यंत आरइन्फ्रा-टी भांडवली खर्चाची गरज अंतर्गत निधीतून भागवीत होती. तथापि, आ.व. ११-१२ पासून आरइन्फ्रा-टी मुंबई ट्रान्समिशन स्ट्रेंदनिंग स्कीम्सच्या अंतर्गत नियोजित भांडवली खर्चासाठी नियमावलीच्या अधीन राहून कर्ज घेत आहे.

आ.व. ११-१२च्या ट्रु-अपसाठी केलेल्या आपल्या याचिकेत (२०१२चे प्रकरण क्र.१२३) आरइन्फ्रा-टीने माननीय आयोगाला माहिती दिली होती की त्यांनी साऊथ इंडियन बँकेकडून ३०० कोटी रुपयांचे कर्ज घेतले होते, ज्याचा उपयोग आ.व. ११-१२च्या सुरुवातीला चालू असलेल्या कामांसाठीच्या नमुनेदार कर्जाऐवजी केला गेला आणि तसेच आ.व. ११-१२च्या दरम्यान भांडवली खर्चासाठी निधी पुरविण्यासाठीही केला गेला.

त्याखेरीज, आरइन्फ्रा-टीने बँक ऑफ महाराष्ट्रकडूनही आ.व. १२-१३मध्ये २५० कोटी रुपयांचे कर्ज घेतलेले होते. या कर्जाचा मोठा हिस्सा १ एप्रिल २०१२ रोजीनुसार नमुनेदार मान्य कर्जाच्या बदल्यात विचारात घेतला होता

आणि उर्वरित कर्ज १ एप्रिल २०१२ रोजीनुसार चालू असलेल्या कामांशी संबंधित कर्जाचे समायोजन करण्यासाठी वापरण्यात आले.

त्यानंतर, आ.व. १२-१३मध्ये आरइन्फ्रा-टीने स्टेट बँक ऑफ हैद्राबादकडून आणि कॉर्पोरेशन बँकेकडूनही कर्ज मंजूर करून घेतले होते, ज्यांचा उपयोग आ.व. १२-१३, आ.व.१३-१४, आ.व. १४-१५ आणि आ.व. १५-१६ साठी भांडवली खर्चासाठी निधी पुरविण्यासाठी केला गेला.

डेट:इक्विटीचे गुणोत्तर ७०:३० असे राखलेले आहे. वर उल्लेख केलेल्या कर्जानंतर, एमवायटी नियमावली, २०११ अनुसार ७०% कर्ज ''नमुनेदार'' म्हणून विचारात घेतलेले आहे.

### ३.१.२. कर्जाऊ भांडवलावरील व्याज

आइन्फ्रा-टीचे म्हणणे असे आहे की, माननीय आयोगाने एमवायटी आदेशात आरइन्फ्रा कंपनीसाच्या दीर्घकालीन कर्जासाठी सरासरी व्याजदर (वेटेड ॲव्हरेज) ८.७८% एवढा एकूणच हिशेबात घेतलेला आहे आणि तोही कंपनीने परवानाप्राप्त व्यवसायासाठी केलेल्या भांडवली खर्चासाठी घेतलेली विशिष्ट कर्जे विचारात न घेता.

आरइन्फ्रा-टीचे म्हणणे असे आहे की, एमवायटी नियमावलीच्या विनियम ३३.५मध्ये नमूद केलेले मुदतीचे ''वास्तविक कर्ज'' या संज्ञेचा अर्थ कोणत्याही नियामक व्यवसायाने घेतलेले वास्तविक कर्ज; मग त्याला माननीय आयोगाने मान्यता दिलेली असो वा नसो.

आरइन्फ्रा-टी नम्रपणे असे म्हणते की, एमवायटी नियमावली, २०११ फक्त माननीय आयोगाच्या कार्यकक्षेतील नियामक व्यवसायांशी संबंधित असल्याने, एमवायटी कालावधीसाठीच्या सरासरी व्याजदरांची (वेटेड ॲव्हरेज इंटरेस्ट रेट) निश्चिती एकतर आरइन्फ्रा-टीने घेतलेले वास्तविक कर्जाचा विचार करून किंवा जर माननीय आयोगाने आरइन्फ्रा-टीने भांडवली खर्चासाठी घेतलेल्या कर्जांना मान्यता दिली नाही, तर आरइन्फ्रा-टीचे सर्व कर्जाऊ भांडवल नमुनेदार म्हणून विचारात घ्यावे आणि माननीय एटीईच्या निकालांनुसार बाजारपेठेत प्रतिबिंबित होणारा व्याजदर निश्चित केला जावा.

या याचिकेत ट्रुईंग-अप करण्यासाठी आरइन्फ्रा-टीने घेतलेल्या सर्व वास्तविक भांडवली कर्जांचा सरासरी व्याजदर हिशेबात घेण्याचा दृष्टिकोन आरइन्फ्रा-टीने अवलंबलेला आहे. आरइन्फ्रा-टीचे म्हणणे असे आहे की, माननीय एटीईच्या निकालांचा विचार करता, कंपनीने आर्थिक वर्षात वास्तविकपणे उभारलेल्या कर्जावरील वेटेड सरासरी व्याजदर हे बाजारपेठेत प्रतिबिंबित होणाऱ्या दरांचे योग्य प्रतिनिधित्व करतात.

एमवायटी नियमावलीतील विनियम ३३.४ नुसार आरइन्फ्रा-टीने घसाऱ्याइतकीच परतफेड विचारात घेतलेली आहे आणि नमुनेदार शेवटच्या शिल्लक रकमा निश्चित केलेल्या आहेत. वास्तविक कर्जे जेव्हा परतफेड करण्यासाठी देय असतील, तेव्हा त्यांच्यासाठी पुनर्अर्थसहाय्य करण्याची आरइन्फ्रा-टीची इच्छा आहे, ज्यायोगे कर्जांची परतफेड घसाऱ्याच्या प्रोजेक्ट ॲक्रुअल्समधून करता येऊ शकेल.

### ३.१.३ इतर आर्थिक आकार

आ.व. १२-१३मध्ये आरइन्फ्रा-टीने घेतलेल्या कर्जासाठी ०.९० कोटी रुपये एवढे प्रक्रिया शुल्क भरलेले आहे. असे शुल्क आ.व. १२-१३साठी वार्षिक महसुलाच्या आवश्यकतेची गणना करताना कर्जाऊ भांडवलावरील व्याजात समाविष्ट केली गेलेली आहे आणि कर्जाऊ भांडवलावरील व्याजाचा एक भाग म्हणून दर्शविलेली आहे.

### ३.१.४ सेवानिवृत्ती

आरइन्फ्रा-टीचे म्हणणे असे आहे की, त्यांनी आ.व. १२-१३मध्ये पोर्सेलेन इन्शुलेटर्स प्रणालीच्या सेवेतून बाद केलेले आहेत. या इन्शुलेटर्सची जागा पॉलिमर इन्शुलेटर्सने घेतली. अशा प्रकारे सेवेतून बाद केल्यामुळे झालेला परिणाम त्या अनुषंगाने ढोबळ स्थिर मालमत्तेत (जीएफए), घसाऱ्यात आणि इक्विटीवरील परताव्यात समायोजित केलेला आहे. कर्जाऊ भांडवलाचा विचार करता, हे इन्शुलेटर्स डीटीपीएसमधून पारेषण वाहिन्या सुरू करण्याच्या वेळेस उभारलेले असल्यामुळे त्यांच्याशी संबंधित नमुनेदार कर्जाची परतफेड झालेली आहे असे समजले जाऊ शकते व त्याचे समायोजन ते सेवेतून बाद केल्यामुळे कर्जाऊ भांडवलामध्ये करण्याची आवश्यकता नाही. त्यानुसार मालमत्तेच्या विक्रीमुळे झालेला तोटा/नफा प्रचालन आणि देखभाल खर्चात/दरपत्रकाव्यतिरिक्तच्या उत्पन्नात हिशेबात धरलेला आहे.

### ३.१.५ घसारा

एमवायटी नियमावलीच्या विनियम ३१मध्ये घसाऱ्याची गणना करण्याच्या पद्धतीची तरतूद आहे.

एमवायटी नियमावलीच्या विनियम ३१ चे अनुपालन करण्यासाठी १ एप्रिल २०१२ रोजीनुसार असलेल्या मालमत्तेच्या सुरुवातीच्या शिलकेवरील घसारा एमवायटी नियमावलीत दिलेले घसाऱ्याचे दर वापरून निश्चित केलेला आहे, परंतु तो फक्त मूळ किमतीच्या ७०% पर्यंतच आहे. अशा मालमत्तेपैकी कोणतीही मालमत्ता एमवायटी कालावधीमध्ये ७०% पर्यंत पोहोचली, तर उर्वरित मूल्याची तरतूद एमवायटी नियमावलीत पारेषण वाहिनीसाठी आणि एसी व डीसी उपकेंद्रांसाठी आणि नियमावलीत तरतूद नसलेल्या उपयुक्त आयुर्मानासाठी, कंपनी कायदा, १९५६नुसार विचार केला जाईल.

### ३.१.६ इक्विटीवरील परतावा

आ.व. १२-१३साठी इक्विटीवरील परताव्याची (आरओई) गणना एमवायटी नियमावलीतील विनियम ३२.२ वर आधारित, म्हणजेच वर्षाच्या सुरुवातीला असलेल्या समभाग भांडवलावर १५.५% दराने अधिक वर्षाच्या दरम्यान सेवामुक्त केलेल्या मालमत्तेच्या प्रमाणात इक्विटी वजा केल्यानंतर भांडवलीकरण केलेल्या मालमत्तेच्या इक्विटी पोर्शनच्या ५०% एवढी केलेली आहे.

## ३.२ प्रचालन आणि देखभाल (ओ अँड एम) खर्च

### ३.२.१ एमवायटी नियमावलीनुसार मापदंड

आ.व. १२-१३मध्ये भर घातलेल्या वास्तविक मालमत्तेच्या आधारे प्रचालन आणि देखभाल खर्च, एमवायटी नियमावलीच्या विनियम ६१.५ मध्ये तरतूद केल्यानुसार, आ.व. १२-१३मध्ये भर घातलेली बेज्ची एकूण संख्या आणि वाहिन्यांची लांबी विचारात घेऊन हिशेबात धरलेला आहे. मापदंडांनुसार प्रचालन आणि देखभाल खर्च ३४.४० कोटी रुपये एवढा आहे. याची तुलना आ.व. १२-१३च्या वास्तविक प्रचालन आणि देखभाल खर्चाशी केली गेली आहे.

### ३.२.२ वास्तविक प्रचालन आणि देखभाल खर्च

आ.व. १२-१३ साठीचा वास्तविक प्रचालन आणि देखभाल खर्च, परवानगी दिलेले कॉर्पोरेट खर्च आणि भांडवलीकरण केलेला खर्च विचारात घेतल्यानंतर ३४.६० कोटी रुपये एवढा आहे.

### ३.२.३ प्रचालन आणि देखभालीतील कार्यक्षमता नफा/तोटा

प्रचालन आणि देखभाल खर्चातील तफावत हे एमवायटी नियमावलीच्या विनियम १२.२ (जी) नुसार नियंत्रित करण्याजोग्या घटकांमुळे झालेली आहे. ह्या तफावतीची गणना मापदंडांनुसारची वास्तविक आकडेवारी तसेच वास्तविक प्रचालन आणि देखभाल खर्चामधील फरकाच्या आधारे केलेली आहे.

आरइन्फ्रा-टीचे म्हणणे असे आहे की, एमवायटी नियमावलीत दिलेले मापदंड आ.व. ०७-०८ ते आ.व. ०९-१० या कालावधीतील वास्तविक प्रचालन आणि देखभाल खर्च आणि बेज्ची आणि वाहिन्यांच्या लांबीची आकडेवारी यांच्या आधारे निश्चित करण्यात आले होते. त्या कालावधीमध्ये आरइन्फ्राचे कॉर्पोरेट खर्च फक्त आरइन्फ्रा-डीच्या वाट्यात टाकले गेले होते आणि आरइन्फ्रा-टी आणि आरइन्फ्रा-जीचा त्यात कोणताही वाटा नव्हता. तथापि, माननीय आयोगाने २०११च्या प्रकरण क्र. १८०मध्ये दिलेल्या निर्देशांच्या अनुषंगाने आरइन्फ्राने आ.व. ११-१२ पासून हे कॉर्पोरेट खर्च आरइन्फ्रा-डी बरोबरच आरइन्फ्रा-टी आणि आरइन्फ्रा-जी यांच्याकडे टाकण्यासही परवानगी दिली. एमवायटी मापदंड हे आ.व. ११-१२ पूर्वीच्या खर्चाची आकडेवारी वापरून तयार केलेले असल्याने हे एमवायटी मापदंड कॉर्पोरेट खर्चाच्या तुलनेत कमी दाखविलेले आहेत. म्हणून वास्तविक खर्च आणि नमुनेदार खर्च यांची खरी तुलना वास्तवकि खर्चांमधून कॉर्पोरेट खर्च वजा केल्यानंतर केली गेली पाहिजे.

अशा प्रकारे, ३४.४० कोटी रुपये एवढ्या नमुनेदार खर्चाची तुलना ३३.८४ कोटी रुपये एवढ्या वास्तविक खर्चाबरोबर (कॉर्पोरेट अ‍ॅलोकेशन वगळून) केली गेली पाहिजे, परिणामस्वरूपी ०.५६ कोटी रुपयांचा लाभ दिसून येईल.

एमवायटी नियमावलीच्या विनियम १४.१मध्ये नियंत्रणयोग्य घटकांमुळे झालेला लाभ वाटून घेण्याच्या यंत्रणेची तरतूद आहे. अशा प्रकारे, सदर विनियमानुसार २/३ लाभ म्हणजे ०.३७ कोटी रुपये एवढ्या रकमेचा दावा वार्षिक महसुलाच्या आवश्यकतेत प्रचालन आणि देखभाल खर्चाचा हिस्सा म्हणून केलेला आहे.

### ३.२.४ प्रचालनाशी संबंधित अतिरिक्त खर्च

आरइन्फ्रा-टीने २०१२च्या प्रकरण क्र. १४१मधील याचिकेत असे म्हटलेले आहे की, नवीन घडामोडींमुळे तसेच आरइन्फ्रा पारेषण आणि वितरण व्यवसायात काही विशिष्ट खर्च निश्चित केल्याने/त्यांची पुन्हा गटवारी केल्याने विशिष्ट अतिरिक्त खर्च करावे लागत आहेत. आरइन्फ्रा-टीने असे म्हटले होते की, हे खर्च एमवायटी मापदंड निश्चित करण्यासाठी उपयोगात आणलेल्या पूर्वापार चालत आलेल्या प्रचालन आणि देखभाल खर्चाचा भाग नव्हते. त्या अनुषंगाने, एमवायटी याचिकेत नियमावलीने मान्यता दिलेल्या नमुनेदार वाटपाव्यतिरिक्त ह्या खर्चांचे भाकीत स्वतंत्रपणे केले गले होते.

माननीय आयोगाने दिनांक १३ जून २०१३ रोजी दिलेल्या एमवायटी आदेशात मापदंडांनुसार लागू असलेल्या प्रचालन आणि देखभाल खर्चांच्या व्यतिरिक्त अशा खर्चांनाही मान्यता देण्याची कृपा केली होती. वर म्हटल्यानुसार, आरइन्फ्रा-टी आ.व. १२-१३साठी या शीर्षकांसाठीही वास्तविक खर्चांचा दावा करीत आहे.

ह्या खर्चांचे स्वरूप आणि वास्तविक खर्च खाली दिलेले आहेत:

- *एससीएडीए आकार:*

  आरइन्फ्रा-टीने आरे येथे अत्याधुनिक सिस्टीम कंट्रोल सेंटर स्थापन केले. आरइन्फ्रा-टीकडे स्वतंत्र एससीएडीए केंद्र नाही, पण विद्यमान सिस्टीम कंट्रोल सेंटरमुळे मुंबई क्षेत्रातील आरइन्फाच्या संपूर्ण पारेषण आणि वितरण जाळ्याची गरज भागविली जाते.

  आरइन्फ्रा-टीने वार्षिक महसुलाच्या आवश्यकतेत एससीएडीए खर्च हे आ.व. १२-१३ पासून पुढील अतिरिक्त प्रचालन आणि देखभाल खर्चाचा भाग म्हणून हिशेबात घेतलेले आहेत. कर्मचाऱ्यांवरील खर्चाचे वाटप आरइन्फ्रा-टी आणि आरइन्फ्रा-डी यांच्या वाट्याला आलेल्या डेस्क्सच्या गुणोत्तराच्या आधारावर केले गेले आहे. प्रशासन आणि सामान्य खर्च तसेच दुरुस्ती आणि देखभाल खर्च हे आरइन्फ्रा-टी आणि आरइन्फ्रा-डी यांना नियंत्रण केंद्राने हाताळलेल्या वास्तविक डेटा पॉईंटस्च्या प्रमाणात दिले गले आहेत.

- *जमीन-वापर आकार:*

  आरइन्फ्रा-टीने सध्या ८ ईएचव्ही केंद्रे कार्यान्वित केलेली आहेत. आरइन्फ्रा-टीने गोरेगाव, गोराई, साकी, बोरीवली आणि चेंबूर येथे ५ ईएचव्ही केंद्रे कार्यान्वित करण्याच्या कामाला प्राधान्य दिलेले आहे, जी आरइन्फ्रा-डीच्या सध्याच्या संग्रहण केंद्रांच्या भूखंडांवरच कार्यान्वित केली गेली आहेत. त्याचप्रमाणे, आरे, वर्सोवा आणि घोडबंदर ईएचव्ही केंद्रांच्या भूखंडांवर आणि आरइन्फ्रा-टी मालमत्तेचा हिस्सा असलेल्या बेसवर आरइन्फ्रा-डीची काही इन्स्टॉलेशन्स आहेत.

  आपल्या एमवायटी याचिकेत आरइन्फ्रा-टीने माननीय आयोगाला अशी माहिती दिलेली आहे की, जमीन वापरासाठीच्या भाड्यासाठी औपचारिक व्यवस्थेवर विचार केला जात आहे आणि या व्यवसायांमधील भाड्याचे आकार आ.व. १२-१३ पासून अशा व्यवस्थेच्या आधारे हिशेबात घेतले जातील.

आरइन्फ्रा-टीने आरइन्फ्रा-टी आणि आरइन्फ्रा-डी यांच्यातील जमीन वापरासाठीच्या आकारांच्या व्यवस्थेला माननीय आयोगाच्या कार्यालयात सादर केलेल्या सभेच्या इतिवृत्ताच्या माध्यमातून अंतिम रूप दिलेले आहे. सभेच्या इतिवृत्ताच्या आधारे, जमीन वापर आकाराचा दावा अतिरिक्त प्रचालन आणि देखभाल खर्चाचा भाग म्हणून आ.व. १२-१३ पासून पुढे वार्षिक महसुलाच्या आवश्यकतेत केलेला आहे.

वर जे म्हटलेले आहे, त्याच्या आधारे आरइन्फ्रा-टीने आ.व. १२-१३ साठी दावा केलेल्या वास्तविक प्रचालन आणि देखभाल खर्चाचा सारांश पुढीलप्रमाणे आहे:

**तक्ता २: सारांश - वास्तविक प्रचालन आणि देखभाल खर्च**

| आ.व. १२-१३साठी प्रचालन आणि देखभाल खर्च (कोटी रु.) | वास्तविक | नमुनेदार वास्तविक | फरक | कार्यक्षमता लाभासह निव्वळ पात्रता | एमवायटी आदेश |
|---|---|---|---|---|---|
| प्रचालन आणि देखभाल खर्च (कॉर्पोरेट ॲलोकेशन वगळून) | ३३.८४ | ३४.४० | ०.५६ | ३४.२१ | ३४.४० |
| कॉर्पोरेट ॲलोकेशन | ०.७६ | - | (०.७६) | ०.७६ | - |
| ऊर्जा आकार | - | - | - | - | ३.०९ |
| एससीएडीए आकार | १.२२ | - | (१.२२) | १.२२ | १.२३ |
| जमीन वापर आकार | ३.३४ | - | (३.३४) | ३.३४ | ६.९१ |
| केबल टाकण्यासाठी भाडे | - | - | - | - | ०.०९ |
| **एकूण** | **३९.१६** | **३४.४०** | **(४.७६)** | **३९.५३** | **४५.७२** |

### ३.३ खेळत्या भांडवलावरील व्याज

खेळत्या भांडवलाच्या आवश्यकतेची गणना एमवायटी नियमावलीमधील विनियम ३५.२ प्रमाणे केलेली आहे. आ.व. १२-१३साठी खेळत्या भांडवलावरील व्याजाचा दर आर्थिक वर्षाच्या १ एप्रिल रोजीनुसार भारतीय स्टेट बँकेच्या स्टेट बँक ॲडव्हान्स रेट (एसबीएआर) एवढा, म्हणजेच १४.७५% आहे.

### ३.४ आकस्मिकता राखीव निधीसाठी वर्गणी

आकस्मिकता राखीव निधीची गणना एमवायटी नियमावलीच्या विनियम ३६.१ नुसार केलेली आहे, म्हणजेच सुरुवातीच्या जीएफएच्या ०.२५% एवढी.

### ३.५ आयकर

आरइन्फ्रा-टीने आ.व. १२-१३साठी आयकराची गणना माननीय आयोगाने दिनांक २ डिसेंबर २०१३ रोजी २०१२च्या प्रकरण क्र. १३८ व १३९मध्ये दिलेल्या निकालात निर्धारित केलेल्या पद्धतीनुसार केलेली आहे.

आरइन्फ्रा-टीने आ.व. १२-१३साठी आयकराची गणना, उत्पन्न वजा अनुज्ञेय खर्च यांवर आधारित केलेली आहे. आयकराची निश्चिती कॉर्पोरेट कराच्या दराने म्हणजेच ३२.४५% (अधिभार आणि शुल्कासह) आ.व. १२-१३साठी लागू असल्यानुसार केलेली आहे. तथापि, आ.व. १२-१३मध्ये कोणत्याही प्रकारे नियामक पीबीटी नसल्याने त्या वर्षासाठी आयकराचा दावा केलेला नाही.

## ३.६ आ.व. २-१३साठी महसूल

### ३.६.१ आंतरराज्य पारेषणातून प्राप्त महसूल

मविनिआ यांनी दिनांक १० सप्टेंबर २०१० रोजी २००९च्या प्रकरण क्र. १२० मध्ये आ.व. १०-११साठी आंतरराज्य पारेषणाच्या दरांना मान्यता दिलेली आहे, ज्यानुसार आरइन्फ्रा-टीला दरमहा ७.७३ कोटी रुपयांचा महसूल प्राप्त झाला. हा महसूल आरइन्फ्रा-टीला आ.व. १२-१३मध्ये मे २०१२पर्यंत प्राप्त झालेला आहे.

मविनिआ यांनी २०१२च्या प्रकरण क्र. ५१मध्ये दिलेल्या आपल्या दिनांक २१ मे २०१२च्या आदेशात आ.व. १२-१३साठी आंतरराज्य पारेषण दरांना १ जून २०१२पासून मान्यता दिली, ज्यानुसार आरइन्फ्रा-टीला जून २०१२ ते मार्च २०१३ या कालावधीमध्ये दरमहा १०.५८ कोटी रुपयांचा महसूल प्राप्त झाला.

अशा प्रकारे, आ.व. १२-१३साठी वसूल झालेला पारेषण आकारांपासूनचा एकूण महसूल १२१.२६ कोटी रुपये एवढा आहे.

### ३.६.२ दरपत्रकाव्यतिरिक्तचे उत्पन्न

आरइन्फ्रा-टीने दरपत्रकाव्यवतिरिक्तचे आ.व. १२-१३मध्ये मिळालेले उत्पन्न पुढील शीर्षकांतर्गत विचारात घेतलेले आहे:

- उपकरणांचे भाडे: १२५ एमव्हीए ट्रान्सफॉर्मर दिनांक ४ फेब्रुवारी २०१२ पासून सहा महिन्यांच्या कालावधीसाठी आरइन्फ्राच्या ईपीसी डिव्हिजनला राजस्थानमधील पोखरण जिल्ह्यात त्यांच्या विनंतीनुसार दिला होता. आ.व. १२-१३ मधील चार महिन्यांच्या संपूर्ण कालावधी प्राप्त झालेले भाडे एनटीआय म्हणून विचारात घेतलेले आहे.

- आकस्मिकता राखीव गुंतवणुकीवरील व्याज: आकस्मिकता राखीव गुंतवणुका भारत सरकारच्या सेक्युरिटिज्मध्ये केल्या जातात आणि त्यानुसार व्याजाची गणना केलेली आहे.

- रोखीत रूपांतरित झालेली नुकसानभरपाई: व्हेंडर्सने उशिरा दिलेल्या विविध उपकरणांच्या डिलिव्हरीसाठी दिलेली नुकसानभरपाईची रक्कम एनटीआयमध्ये विचारात घेतलेली आहे.
- चलनातून झालेला लाभ/तोटा: साहित्य प्राप्त झाल्याची तारीख आणि वास्तविक प्रदान केल्याची तारीख/वर्ष यांच्यातील फरकामुळे झालेला परकीय चलनातील लाभ/(तोटा) एनटीआयमध्ये विचारात घेतलेला आहे.
- भंगाराची विक्री: भंगाराच्या विक्रीतून प्राप्त झालेली रक्कम एनटीआयमध्ये विचारात घेतलेली आहे.
- जमिनीच्या वापरासाठी प्राप्त झालेले भाडे: आरइन्फ्रा-टीला आरइन्फ्रा-डीकडून जमिनीच्या वापरासाठीचे भाडे आरइन्फ्रा-टी आणि आरइन्फ्रा-डी यांच्यातील समझोत्यानुसार (एमओएम) प्राप्त होत असते. त्यानुसार ते एनटीआयमध्ये विचारात घेतलेले आहे.
- गुंतवणुकांवरील व्याज: अर्थसहाय्याची योजना या प्रकरणात विस्तृतपणे स्पष्टीकरण दिल्यानुसार आरइन्फ्रा-टीने आ.व. १२-१३मध्ये कर्जे घेतलेली होती. कर्जाऊ रकमेचा प्रत्यक्ष वापर करीपर्यंत तिची गुंतवणूक सेक्युरिटिज्मध्ये केली होती आणि त्यावरील व्याज एनटीआय म्हणून विचारात घेतलेले आहे.

### ३.६.३ आरइन्फ्रा-टी नेटवर्कच्या उपलब्धतेवरील इन्सेंटिव्ह

एमवायटी नियमावलीतील विनियम ६०.१मध्ये एसी सिस्टीमच्या ९८% लक्ष्य उपलब्धतेच्या वार्षिक पारेषण आकारांची वसुली करण्याची तरतूद आहे.

एमवायटी नियमावलीतील विनियम ६०.२मध्ये पारेषण परवानाधारकाने लक्ष्य उपलब्धतेपेक्षा अधिक वार्षिक उपलब्धता प्राप्त केल्यास त्यासाठी इन्सेंटिव्हची तरतूद आहे. सदर विनियमातच अशी तरतूद आहे की, एसी सिस्टीमसाठी ९९.७५% वरील उपलब्धतेसाठी इन्सेन्टिव्ह देय नसेल.

महाराष्ट्र राज्य भार प्रेषण केंद्राने (एमएसएलडीसी) आरइन्फ्रा-टीसाठीची आ.व. १२-१३मधील पारेषण प्रणाली उपलब्धता ९९.७७% एवढी प्रमारित केलेली आहे.

विनियम ६०.१ आणि ६०.२ यांच्या एकत्रित वाचनानुसार, आरइन्फ्रा-टीने पारेषण उपलब्धतेवरील इन्सेन्टिव्हची गणना, उपलब्धतेला ९९.७५% पर्यंत सीमित करून केलेली आहे. इन्सेन्टिव्ह निश्चित करण्यासाठी वार्षिक पारेषण आकार हे दरपत्रकाव्यतिरिक्तचे उत्पन्न आणि इतर व्यवसायांपासूनचे उत्पन्न वजा जाता विचारात घेतलेले आहेत. आ.व. १२-१३साठीचे इन्सेंटिव्ह ३.७६ कोटी रुपये एवढे आहे.

### ३.७ आ.व. १२-१३साठी महसुलातील तफावत/अधिक्य

आ.व. १२-१३साठी महसुलातील तफावत/अधिक्य हे आंतरराज्य पारेषणातून मिळालेले उत्पन्न आणि एकत्रित महसुलाची आवश्यकता यांची तुलना करून हिशेबात घेतलेले आहे (दरपत्रकाव्यतिरिक्तचे उत्पन्न आणि इतर व्यवसायांपासूनचे उत्पन्न वजा जाता).

आ.व. १२-१३साठीच्या वार्षिक महसुलाची आवश्यकता खाली तक्त्याच्या रूपाने दिलेली आहे:

**तक्ता ३: आ.व. १२-१३साठी ट्रुईंग अप सारांश**

| अ.क्र. | तपशील (कोटी रु.) | वास्तविक | एमवायटी आदेश | फरक |
|---|---|---|---|---|
| | **खर्च** | | | |
| १ | प्रचालन आणि देखभाल खर्च | ३९.५३ | ४५.७२ | (६.१९) |
| २ | दीर्घकालीन कर्जाऊ भांडवलावरील व्याज | ६७.४६ | ४८.५३ | १८.९३ |
| ३ | घसारा | ४२.९५ | ४७.९३ | (४.९८) |
| ४ | इक्विटीवरील परतावा | ५९.८६ | ६१.०९ | (१.२३) |
| ५ | खेळत्या भांडवलावरील व्याज | ३.१७ | ३.२० | (०.०३) |
| ६ | आकस्मिकता राखीव निधीसाठी वर्गणी | २.३८ | २.३८ | (०.००) |
| ७ | आयकर | - | - | - |
| **अ** | **एकूण खर्च** | **२१५.३६** | **२०८.८५** | **६.५१** |
| ८ | उपलब्धता इन्सेंटिव्ह | ३.७६ | - | ३.७६ |
| | **महसूल** | | | |
| ९ | आंतरराज्य पारेषणातून महसूल | १२१.२६ | १२१.२६ | - |
| १० | दरपत्रकाव्यतिरिक्तचे उत्पन्न | ४.५४ | २.८० | १.७४ |
| ११ | इतर व्यवसायांपासूनचे उत्पन्न | - | - | - |
| **ब** | **एकूण महसूल** | **१२५.८०** | **१२४.०६** | **१.७४** |
| | **महसुलातील तफावत/(अधिक्य) = (ब-अ)** | **९३.३३** | **८४.७९** | **८.५३** |

आरइन्फ्रा-टी माननीय आयोगाला वास्तविक खर्चांना व महसुलाला मान्यता देण्याची आणि आ.व. १२-१३च्या ट्रुईंग अपसाठी त्यांचा विचार करण्याची विनंती करीत आहे.

# ४. आ.व. १३-१४साठी ट्रुईंग अप

या याचिकेत आरइन्फ्रा-टी लेखापरीक्षित हिशेबांच्या आधारे आ.व. १३-१४मध्ये केलेले वास्तविक खर्च आणि प्राप्त केलेला वास्तविक महसूल ट्रुईंग अपसाठी सादर करीत आहे. आरइन्फ्रा-टी माननीय आयोगाला आ.व. १३-१४साठी ट्रुईंग अप करण्याची विनंती करीत आहे.

## ४.१. भांडवली खर्च आणि भांडवलीकरण

आ.व. १३-१४मध्ये आरइन्फ्रा-टीने ५२.६२ कोटी रुपये भांडवली खर्चासाठी खर्च केलेले आहेत आणि वास्तविक भांडवलीकरण ५२.०६ कोटी रुपये एवढे आहे.

आ.व. १३-१४साठी भांडवली खर्चाचा आणि भांडवलीकरणाचा सारांश पुढीलप्रमाणे आहे:

**तक्ता ४: सारांश - भांडवली खर्च आणि भांडवलीकरण**

| कोटी रु. | | वास्तविक | एमवायटी आदेश |
|---|---|---|---|
| भांडवली खर्च | डीपीआर | ४९.६१ | - |
| | बिगर-डीपीआर | ३.०१ | - |
| | **एकूण** | **५२.६२** | **-** |
| भांडवलीकरण | डीपीआर | ४४.७९ | २३०.२९ |
| | बिगर-डीपीआर | ७.२७ | १६.०० |
| | **एकूण** | **५२.०६** | **२४६.२९** |

आरइफ्रा-टीने एमवायटी याचिकेत भांडवलीकरणाचे भाकीत अशा प्रकारे केलेले आहे की, सध्या चालू असलेली कामे आ.व. १३-१४पर्यंत संपतील. तथापि, नव्याने कार्यान्वित केलेल्या संग्रहण केंद्रांशी संबंधित कुंपणाच्या भिंती बांधणे, अंतर्गत रस्ते तयार करणे, इत्यादी विशिष्ट सिव्हिल कामे अशी आहेत, जी आ.व. १४-१५ आणि आ.व. १५-१६मध्ये विभागलेली आहेत. भांडवलीकरणाचे अशा प्रकारची विभागणी त्यानुसार आ.व. १४-१५ आणि आ.व. १५-१६मध्ये प्रतिबिंबित झालेली आहे.

आरइन्फ्रा-टीचे असे म्हणणे आहे की, आ.व. १३-१४मध्ये केलेल्या वास्तविक भांडवलीकरणाचे तसेच आरइन्फ्रा-टीच्या २०१२च्या प्रकरण क्र.१४१मध्ये दिलेल्या एमवायटी आदेशात मान्यता दिलेल्या भांडवलीकरणाचे अवलोकन केल्यास त्यात सुमारे २०० कोटी रुपयांची तफावत असून ते कमी झालेले आहे. ह्या कमी भांडवलीकरणासाठी कारणीभूत असलेल्या मुख्य बाबी म्हणजे सीमांशी संबंधित विवाद, बृहन्मुंबई महानगरपालिकेडऊन वैधानिक मान्यतांसाठी होणारा विलंब, कंत्राटदार बदलल्यामुळे विशिष्ट सिव्हिल आणि फिनिशिंगची कामे पूर्ण न होणे, अतिरिक्त ट्रान्सफॉर्मर्स कार्यान्वित करणे (सध्याच्या प्रक्रियेत भूविकास, युटिलिटी कनेक्टिव्हिटी, कुंपणाच्या भिंतींचे बांधकाम, अंतर्गत रस्ते, इतर प्रचालनात्मक सुविधा, इत्यादी), परवानगी मिळण्यास विलंब होणे, सरकारी परवानग्या इत्यादींमुळे जमीन संपादनातील विलंब ह्या आहेत.

### ४.१.१ अर्थसहाय्याची योजना

आ.व. १२-१३साठी अर्थसहाय्याची योजना या विभागात आरइन्फ्रा-टीने त्यांनी बहुवार्षिक दरपत्रकाच्या कालवधीत भांडवलासाठी कसा निधी उभारलेला आहे हे स्पष्ट केलेले आहे. आ.व. १३-१४मध्ये स्टेट बँक ऑफ हैद्राबाद आणि कॉर्पोरेशन बँक यांनी मंजूर केलेल्या कर्जातून भांडवली कामांसाठी अतिरिक्त निधी काढून घेतला. या कर्जाचा काही हिस्सा सुरुवातीला प्रगतिपथावर असलेल्या कामांना पुन्हा अर्थपुरवठा करण्यासाठी वापरण्यात आला आणि उर्वरित कर्ज आ.व. १३-१४मध्ये ताज्या भांडवली खर्चांना अर्थपुरवठा करण्यासाठी वापरण्यात आले.

### ४.१.२ कर्जाऊ भांडवलावरील व्याज

आ.व. १२-१३च्या ट्रुईंग अपमधील विभागात स्पष्ट केल्यानुसार आ.व. १३-१४साठीचा वेटेड सरासरी व्याजदर, सर्व वास्तविक कर्जे आणि त्यांचे संबंधित व्याजदर आणि व्याज आणि मुद्दल आरइन्फ्रा-टीचा वास्तविक डेट पोर्टफोलिओ वापरून निश्चित करण्यात आलेला आहे.

अशा प्रकारे निश्चित केलेला व्याजदर त्यानंतर वार्षिक महसुलाच्या आवश्यकतेत आकारण्यासाठी, एमवायटी नियमावली, २०११ अनुसार नमुनेदार शिल्लक कर्जाला लागू केला जातो (परतफेडीएवढाच घसारा विचारात घेतल्यानंतर).

### ४.१.३ सेवानिवृत्ती

आरइन्फ्रा-टीचे असे म्हणणे आहे की, त्यांनी आ.व. १३-१४मध्ये कंपनीच्या मालकीची दोन वाहने प्रणालीतून सेवानिवृत्त केलेली आहेत. या निवृत्तीचा परिणाम त्यानुसार ढोबळ स्थिर मालमत्तेत (जीएफए), घसाऱ्यात, कर्जाऊ भांडवलात आणि इक्विटीवरील परताव्यात समायोजित करण्यात आलेला आहे. मालमत्तेच्या विक्रीतून झालेला तोटा/नफा त्यानुसार प्रचालन आणि देखभाल खर्चात/दरपत्रकाव्यतिरिक्तच्या उत्पन्नात हिशेबात घेतलेला आहे.

### ४.१.४ घसारा

एमवायटी नियमावलीच्या विनियम ३१ अनुसार आणि घसाऱ्याशी संबंधित आ.व. १२-१३च्या संबंधित विभागात स्पष्टीकरण दिल्यानुसार घसाऱ्याची गणना केलेली आहे.

### ४.१.५ इक्विटीवरील परतावा

आ.व. १३-१४साठी इक्विटीवरील परतावा (आरओई) एमवायटी नियमावलीच्या विनियम ३२.२ च्या आधारेल म्हणजेच वर्षाच्या सुरुवातीला असलेल्या समभाग भांडवलावर १५.५% दराने अधिक वर्षभरात सेवेतून रद्द केलेल्या मालमत्तांना वगळून भांडवलीकरण केलेल्या मालमत्तेच्या ५०% इक्विटी पोर्शनवर गणलेला आहे.

## ४.२ प्रचालन आणि देखभाल (ओ अँड एम) खर्च

### ४.२.१ एमवायटी नियमावलीनुसार मापदंड

आ.व. १३-१४ दरम्यान भर घातलेल्या वास्तविक मालमत्तांवर आधारित, एमवायटी नियमावलीतील विनियम ६१.५ मध्ये तरतूद केलेल्या मापदंडानुसार, आ.व. १३-१४ मध्ये भर घातलेल्या बेज्ची संख्या आणि वाहिन्यांची लांबी विचारात घेऊन प्रचालन आणि देखभाल खर्चाची गणना केलेली आहे. मापदंडांनुसार प्रचालन आणि देखभाल खर्च ३८.६४ कोटी रुपये एवढा आहे. आ.व. १३-१४ वर्षाच्या वास्तविक प्रचालन आणि देखभाल खर्चाशी याची तुलना केली जाते.

### ४.२.२ वास्तविक प्रचालन आणि देखभाल खर्च

परवानगी दिलेले कॉर्पोरेट खर्च आणि भांडवलीकरण केलेले खर्च विचारात घेतल्यानंतर आ.व. १३-१४ साठीचा वास्तविक प्रचालन आणि देखभाल खर्च ४३.३२ कोटी रुपये आहे.

### ४.२.३ प्रचालनाशी संबंधित अतिरिक्त खर्च

वर याआधीच ''आ.व. १२-१३ साठी ट्रुईंग अप'' शी संबंधित विभागात स्पष्ट केल्यानुसार आरइन्फ्रा-टी आ.व. १३-१४ साठीचे वास्तविक खर्चाचा दावा एससीएडीए आकार आणि जमीन वापर आकार या शीर्षकांखाली करीत आहे. त्याव्यतिरिक्त, आरइन्फ्रा-टी आपल्या वार्षिक महसुलाच्या आवश्यकतेत ऊर्जा आकारांचाही दावा करीत आहे.

- *ऊर्जा आकार:*

  एसटीयूने ७ मे २०१२ दिनांकित पत्र क्र. MSETCL/CO/C.E - STU/ CASE 77 of 2011/6216 द्वारे केलेल्या शिफारशींच्या अनुषंगाने आरइन्फ्रा-टीने त्यांच्या वार्षिक महसुलाच्या आवश्यकतेसाठीच्या याचिकेत आ.व. १३-१४ पासून पढील कालावधीसाठी अतिरिक्त प्रचालन आणि देखभाल खर्चाचा भाग म्हणून विद्युत खर्च हिशेबात घेतलेला आहे. याला माननीय आयोगाने २०१२च्या प्रकरण क्र.१४१मध्ये दिलेल्या एमवायटी आदेशात मान्यता दिलेली आहे. विद्युत खर्चाची रक्कम म्हणजे आरइन्फ्रा-टीला त्यांनी वापरलेल्या विजेसाठी प्राप्त झालेल्या मासिक देयकांची बेरीज होय.

### ४.२.४ प्रचालन आणि देखभालीतील कार्यक्षमता नफा/तोटा

वर याआधीच ''आ.व. १२-१३ साठी ट्रुईंग अप'' शी संबंधित विभागात स्पष्ट केल्यानुसार प्रचालन आणि देखभाल खर्चातील फरक हे एमवायटी नियमावलीच्या नियम १२.२(जी) नुसार नियंत्रित करण्याजोग्या घटकांमुळे झालेली आहे. ह्या तफावतीची गणना मापदंडांनुसारची वास्तविक आकडेवारी तसेच वास्तविक प्रचालन आणि देखभाल खर्चामधील फरकाच्या आधारे केलेली आहे.

अशा प्रकारे, ३८.६४ कोटी रुपयांच्या नमुनेदार खर्चाची तुलना ४०.०१ कोटी रुपयांच्या वास्तविक खर्चाशी (कॉर्पोरेट ॲलोकेशन वगळता) केली गेली पाहिजे, ज्याची परिणती १.३७ कोटी रुपये एवढ्या नियंत्रणयोग्य कार्यक्षमतेत व्हायला हवी.

एमवायटी नियमावलीतील विनियम १४.१मध्ये नियंत्रणयोग्य घटकांमुळे झालेला लाभ वाटून घेण्याची तरतूद आहे. अशा प्रकारे, सदर विनियमाद्वारे १/३ तोटा, म्हणजेच रु. ०.४६ कोटी रुपये दरपत्रकातील अतिरिक्त आकार म्हणून वर्ग केला गेला पाहिजे.

वरील स्पष्टीकरणावर आधारित, वार्षिक महसुलाच्या आवश्यकतेत विचारात घ्यावयाचा प्रचालन आणि देखभाल खर्च पुढीलप्रमाणे असेल:

**तक्ता ५: सारांश - वास्तविक प्रचालन आणि देखभाल खर्च**

| प्रचालन आणि देखभाल खर्च आ.व. १३-१४ (कोटी रु.) | वास्तविक | नमुनेदार वास्तविक | फरक | कार्यक्षमता लाभासह निव्वळ पात्रता | एमवायटी आदेश |
|---|---|---|---|---|---|
| प्रचालन आणि देखभाल खर्च (कॉर्पोरेट ॲलोकेशन वगळता) | ४०.०१ | ३८.६४ | (१.३७) | ३९.१० | ३९.१७ |
| कॉर्पोरेट ॲलोकेशन | ३.३१ | - | (३.३१) | ३.३१ | - |
| ऊर्जा आकार | ३.८१ | - | (३.८१) | ३.८१ | ३.२५ |
| एससीएडीए आकार | ०.९२ | - | (०.९२) | ०.९२ | १.३४ |
| जमीन वापर आकार | ३.५१ | - | (३.५१) | ३.५१ | ६.९१ |
| केबल टाकण्याबद्दल भाडे | - | - | - | - | १०.४८ |
| **एकूण** | **५१.५६** | **३८.६४** | **(१२.९२)** | **५०.६५** | **६१.१५** |

### ४.३ खेळत्या भांडवलावरील व्याज

एमवायटी नियमावलीच्या विनियम क्र. ३५.२ नुसार खेळत्या भांडवलाची गणना केली गेलेली आहे. आ.व. १३-१४साठी खेळत्या भांडवलावरील व्याजदर, आर्थिक वर्षाच्या १ एप्रिल रोजीनुसार असलेल्या भारतीय स्टेट बँकेच्या स्टेट बँक ॲडव्हान्स रेट (एसबीएआर) एवढा, म्हणजेच १४.४५% आहे.

### ४.४ आकस्मिकता राखीव निधीसाठी वर्गणी

आकस्मिकता राखीव निधीसाठी वर्गणीची गणना एमवायटी नियमावलीमधील विनियम ३६.१ अनुसार, म्हणजेच सुरुवातीच्या जीएफएच्या ०.२५% एवढी केलेली आहे.

### ४.५ आयकर

आरइन्फ्रा-टीने आ.व. १३-१४साठीचा आयकर माननीय एटीईने २०१२च्या प्रकरण क्र. १३८ आणि १३९ मध्ये दिनांक २ डिसेंबर २०१३ रोजी दिलेल्या निकालात निर्धारित केलेल्या पद्धतीने केलेली आहे.

आरइन्फ्रा-टीने आ.व. १३-१४साठीचा आयकर उत्पन्न वजा अनुज्ञेय खर्च या आधारावर केलेली आहे. आ.व. १२-१३मध्ये आयकराची गणना करण्यासाठी कर वजा करण्यापूर्वी तोटा झालेला आहे. हा करपूर्व तोटा आ.व. १३-१४च्या करपूर्व नफ्यात आधी समायोजित करून नंतर त्यातील फरकातून जो नफा राहिला, त्यावर लागू असलेल्या दराने आयकराची गणना केलेली आहे. आ.व. १३-१४ साठी लागू असल्यानुसार ३३.९९% एवढ्या कॉर्पोरेट कराच्या दराने आयकर निश्चित करण्यात आलेला आहे (अधिभार आणि शुल्कासह).

### ४.६ आ.व. १३-१४साठी महसूल

#### ४.६.१ आंतरराज्य पारेषणातून प्राप्त महसूल

मविनिआने २०१३च्या प्रकरण क्र. ५६मध्ये दिनांक १३ मे २०१३ रोजी दिलेल्या आदेशात आ.व. १३-१४साठी १ एप्रिल २०१३ पासून लागू असलेले आंतरराज्यीय दरपत्रक लागू केले, त्यानुसार आरइन्फ्रा-टीने दरवर्षी ४१७.५१ कोटी रुपये महसूल म्हणून दाखविलेला आहे.

#### ४.६.२ दरपत्रकाव्यतिरिक्तचे उत्पन्न

आरइन्फ्रा-टीने आ.व. १३-१४साठी दरपत्रकाव्यतिरिक्तचे उत्पन्न हे आकस्मिक राखीव निधीवरील व्याज, नुकसानभरपाईची प्राप्त रक्कम, चलनातून झालेल्या तोट्याची प्राप्त रक्कम, भंगाराची विक्री आणि जमिनीच्या वापरासाठीचे भाडे या शीर्षकांतर्गत विचारात घेतलेले आहे. ह्या शीर्षकांतर्गत असलेल्या उत्पन्नाचे स्वरूप 'आ.व. १२-१३ साठी ट्रुईंग अप' यातील संबंधित विभागात तपशीलवार वर्णन केलेले आहे.

#### ४.६.३ इतर व्यवसायांपासूनचे उत्पन्न

आरइन्फ्राने त्यांच्या उपकेंद्रांवरच्या छतावरील जागा रिलायन्स कम्युनिकेशन्स लिमिटेडला बीटीएस टॉवर्स उभारण्यासाठी भाड्याने दिलेली आहे. अशा प्रकारे मिळणारे भाड्याचे उत्पन्न आतापर्यंत आरइन्फ्रा-डीच्या इतर व्यवसायापासून मिळणारे उत्पन्न म्हणून समजले जात होते. तथापि, आरइन्फ्रा-टी आणि आरइन्फ्रा-डी यांच्यातील खात्यांची शीर्षके आणि व्यवहार वेगवेगळे केल्यानंतर असे लक्षात आलेले आहे की, रिलायन्स कम्युनिकेशन्सला भाड्याने दिलेल्या क्षेत्राचा विशिष्ट हिस्सा हा वस्तुत: आरइन्फ्रा-टीची मालमत्ता (असेट बेस) आहे. अशा प्रकारे, योग्य आणि स्वतंत्र हिशेब ठेवण्यासाठी अशा हिश्श्यापासून मिळालेले उत्पन्न हे आ.व. १३-१४ पासून इतर व्यवसायांपासून आरइन्फ्रा-टीला मिळालेले उत्पन्न म्हणून हिशेबात घेतले जाते. आरइन्फ्रा-टीचा अशा हिश्श्यातील वाटा दरवर्षी ०.११ कोटी रुपये एवढा आहे. तथापि, आ.व. १३-१४मध्ये विचारात घेतलेले उत्पन्न ०.२० कोटी रुपये आहे, कारण आ.व. १३-१४मध्ये मागील देय रक्कमही प्राप्त झालेली आहे. एमवायटी नियमावलीच्या विनियम ६३.१ नुसार आरइन्फ्रा-टीने प्राप्त झालेली १/३ रक्कम, म्हणजेच ०.०७ कोटी रुपये इतर व्यवसायांपासूनचे उत्पन्न म्हणून विचारात घेतलेले आहे.

#### ४.६.४ आरइन्फ्रा-टी नेटवर्कच्या उपलब्धतेवरील इन्सेंटिव्ह

महाराष्ट्र राज्य भार प्रेषण केंद्राने (एमएसएलडीसी) आरइन्फ्रा-टीसाठी पारेषण प्रणाली उपलब्धता ९९.७६% एवढी आ.व. १३-१४ साठी प्रमाणित केलेली आहे.

एमवायटी नियमावलीतील विनियम ६०.१ आणि ६०.२ यांच्या एकत्रित वाचनानुसार, आरइन्फ्रा-टीने पारेषण उपलब्धतेवरील इन्सेंटिव्हची गणना ही उपलब्धता ९९.७५% पर्यंत सीमित करून केलेली आहे. इन्सेंटिव्ह निश्चित करण्यासाठी विचारात घेतलेले वार्षिक पारेषण आकार हे दरपत्रकाव्यतिरिक्तचे उत्पन्न आणि इतर व्यवसायांपासूनचे उत्पन्न वगळून आहेत. आ.व. १३-१४साठीचे इन्सेंटिव्ह ५.६९ कोटी रुपये एवढे आहे.

### ४.७. आ.व. १३-१४साठी महसुलातील तफावत/अधिक्य

आ.व. १३-१४साठीची महसुलातील तफावत/अधिक्य हे आंतरराज्य पारेषणातून मिळालेला महसूल आणि एकत्रित महसुलाची आवश्यकता (दरपत्रकाव्यतिरिक्तचे उत्पन्न आणि इतर व्यवसायांपासूनचे उत्पन्न वजा जाता) गणले गेले आहे.

आ.व. १३-१४साठीच्या वार्षिक महसुलाची आवश्यकतेचा सारांश खाली तक्त्याच्या रूपाने दिलेला आहे:

**तक्ता ६: आ.व. १३-१४ साठी ट्रुईंग अप सारांश**

| अ.क्र. | तपशील (कोटी रु.) | वास्तविक | एमवायटी आदेश | फरक |
|---|---|---|---|---|
| | **खर्च** | | | |
| १ | प्रचालन आणि देखभाल खर्च | ५०.६५ | ६१.१५ | (१०.५०) |
| २ | दीर्घकालीन कर्जाऊ भांडवलावरील व्याज | ७६.७८ | ६४.९५ | ११.८३ |
| ३ | घसारा | ५७.७१ | ६५.०९ | (७.३८) |
| ४ | इक्विटीवरील परतावा | ७०.२८ | ७७.२७ | (६.९८) |
| ५ | खेळत्या भांडवलावरील व्याज | ८.५८ | ६.१९ | २.३९ |
| ६ | आकस्मिकता राखीव निधीसाठी वर्गणी | ३.३७ | ३.५० | (०.१३) |
| ७ | आयकर | १.०१ | - | १.०१ |
| ८ | आ.व. १०-११चे ट्रुईंग अप | १०.५० | १०.५० | - |
| ९ | आ.व. ११-१२च्या ट्रुईंग अपमधील तफावत | २८.५५ | २८.५५ | - |
| १० | २०१०च्या अपील क्र. २०३मधील माननीय एटीईच्या निकालाचा परिणाम | १२.२० | १२.२० | - |
| ११ | आ.व. १२-१३ची महसुलातील तफावत | ९३.३३ | ८४.७९ | ८.५३ |
| **अ** | **पारेषण दरपत्रकातून वसुली करण्यासाठीचा एकूण खर्च** | **४१२.९६** | **४१४.१९** | **(१.२३)** |
| १२ | उपलब्धता इन्सेंटिव्ह | ५.६९ | - | ५.६९ |
| | **महसूल** | | | |
| १३ | एमवायटी आदेशानुसार आंतरराज्य पारेषणातून महसूल | ४१७.५१ | ४१७.५१ | - |
| १४ | दरपत्रकाव्यतिरिक्तचे उत्पन्न | १.१६ | २.६६ | (१.५०) |
| १५ | इतर व्यवसायांपासूनचे उत्पन्न | ०.०७ | - | ०.०७ |
| **ब** | **एकूण महसूल** | **४१८.७४** | **४२०.१७** | **(१.४३)** |
| **क** | **महसुलातील तफावत/(अधिक्य) = (ब-अ)** | **(०.०९)** | **(५.९९)** | **५.९०** |

आरइन्फ्रा-टी माननीय आयोगाला वास्तविक खर्चाला आणि महसुलाला मान्यता देऊन त्याचा विचार आ.व. १३-१४च्या ट्रुईंग अपसाठी करण्यात यावा अशी विनंती करीत आहे.

## ५. आ.व. १४-१५साठी वार्षिक कामगिरी पुनरावलोकन (एपीआर)

या विभागात, आरइन्फ्रा-टी आ.व. १४-१५ साठी पहिल्या सहामाहीतील अलेखापरीक्षित वास्तविक आकडेवारी आणि दुसऱ्या सहामाहीसाठीची भाकिते यांच्यावर आधारित तात्पुरत्या स्वरूपातील खर्च आणि महसूल सादर करीत आहे. आरइन्फ्रा-टी माननीय आयोगाला आ.व. १४-१५साठी तात्पुरत्या स्वरूपातील ट्रु-अप करण्याची विनंती करीत आहे.

### ५.१ भांडवल गुंतवणूक योजना

आ.व. १२-१३ आणि आ.व. १३-१४च्या ट्रुईंग अपमधील संबंधित विभागांमध्ये वर उल्लेख केलेले आ.व. १२-१३ आणि आ.व. १३-१४ मधील भांडवलीकरणाची विभागणी त्यानुसार आता आ.व. १४-१५ आणि आ.व. १५-१६मध्ये प्रतिबिंबित झालेली आहे. विभाणीमधील कामांमध्ये नव्याने कार्यान्वित केलेल्या संग्रहण केंद्रासाठी कुंपणाची भिंत बांधणे, अंतर्गत रस्ते तयार करणे, इत्यादी सिव्हिल कामांचा मुख्यतः समावेश आहे.

आ.व. १४-१५ आणि १५-१६साठीच्या एमवायटी याचिकेत आरइन्फ्रा-टीने २०१२च्या प्रकरण क्र. १४१मध्ये भांडवलीकरणाचे भाकीत पुढीलप्रमाणे केलेले आहे: गोळीबार येथील २२० केव्ही केंद्राशी संबंधित योजनांसाठी (रु.२२९ कोटी), २२० केव्ही नागरी निवारा (रु.३१८ कोटी), विमानतळावरील २२० केव्ही केंद्र (रु. २०१ कोटी) आणि २२० केव्ही दहिसर ईएचव्ही केंद्र (२०८ कोटी).

आमचे असे म्हणणे आहे की, आरइन्फ्रा-टीने आ.व. १४-१५मध्ये जेव्हा या योजनांच्या अंतर्गत कामे सुरू केली होती, तेव्हा आरइन्फ्रा-टीला जमीन संपादन करणे हे काम आव्हानात्म असल्याने ही कामे सध्याच्या नियंत्रण कालावधीमध्ये कधी पूर्ण होतील, याचा अंदाज बांधता आला नाही. म्हणून या योजनांसाठी एमवायटी आदेशामध्ये मान्यता दिलेले भांडवलीकरण आरइन्फ्रा-टीच्या मते प्रत्यक्षात उतरले नाही आणि ते नियंत्रण कालावधीच्या पुढे ढकलले जाईल. त्यानुसार त्याच्याशी संबंधित भांडवली खर्च आणि भांडवलीकरण पुन्हा निश्चित करण्यात आलेले आहे आणि सध्याच्या याचिकेत प्रतिबिंबित झालेले आहे.

**एमवायटी आदेशात समाविष्ट न केलेल्या योजना:**

या विभागात, आरइन्फ्रा-टी भांडवलीकरणाच्या योजनांची व्याप्ती आणि उद्दिष्टे थोडक्यात स्पष्ट करीत आहे, ज्यांना माननीय आयोगाने एकतर एमवायटी याचिका दाखल केल्यानंतर तत्त्वतः मान्यता दिलेली आहे किंवा एमवायटी आदेशानंतर मान्यता दिलेली आहे किंवा त्या आरइन्फ्रा-टीने माननीय आयोगाकडे सादर केलेल्या आहेत आणि तत्त्वतः मान्यतेच्या प्रतीक्षेत आहेत.

- २२० केव्ही केबल आरइन्फ्रा-साकी ते टीपीसी-साकी

वरील योजनेसाठी डीपीआरला माननीय आयोगाने तत्त्वतः मान्यता दिलेली आहे. ह्या योजनेचे आ.व. १५-१६मध्ये भांडवलीकरण होण्याची शक्यता आहे आणि त्यानुसार सदर आर्थिक वर्षात भांडवलीकरण विचारात घेतलेले आहे.

ही जोडणी जोडल्यानंतर सध्याच्या आरइफ्रटी आरे ते आरइन्फ्रा-टी बोरीवली या वाहिनीवर भार कमी होईल. यामुळे सध्याच्या एमएसईटीसीएल कळवा ते टीपीसी-सालसेत वाहिनीवरील भारही कमी होईल.

- आरइन्फ्रा-टी मालमत्तेची प्रणाली सुधार योजना

वर उल्लेख केलेल्या योजनेसाठी डीपीआर माननीय आयोगाकडे तत्त्वतः मान्यतेसाठी सादर केलेले आहे. आरइन्फ्रा-टीचे असे म्हणणे आहे की, त्यांना अशी आशा वाटते की, माननीय आयोग सध्याच्या याचिकेत जेव्हा दरपत्रक आदेश जारी करील, तेव्हा सदर योजनेसाठी तत्त्वतः मान्यता देईल आणि म्हणून आरइन्फ्रा-टीने आ.व. १४-१५ आणि आ.व. १५-१६मध्ये या योजनेसाठी या योजनांबद्दलही भांडवलीकरणाचे भाकीत केलेले आहे. मालमत्तेचे नूतनीकरण/पुनरुज्जीवीकरण केल्याने नेटवर्कला जोडलेल्या घटकांचे आयुर्मान वाढेल. योजना अमलात आल्यास ईव्हीएच केंद्रांच्या पारेषण वाहिनी उपकरणांच्या उपलब्धतेत आणि विश्वसनीयतेत सुधारणा होईल.

- एमएसईटीसीएल नागोठणे आणि आरइन्फ्रा आरे यांच्यामधील २२० केव्ही एचव्हीडीसी (व्हीएससीवर आधारित) जोडणी

वर उल्लेख केलेल्या योजनेसाठी आरइन्फ्रा-टीला तत्त्वतः मान्यता प्राप्त झालेली आहे. या योजनेवर आ.व. १४-१५ आणि आ.व. १५-१६मध्ये भांडवली खर्च करावा लागेल असा आरइन्फ्रा-टीचा अंदाज होता, परंतु सध्याच्या नियंत्रण कालावधीमध्ये कोणतीही मालमत्ता यासाठी कार्यान्वित केली जाण्याची अपेक्षा नाही. अशा प्रकारे, आ.व. १५-१६मध्ये या योजनेचा कोणताही परिणाम नाही. या योजनेसाठी तत्त्वतः मान्यता एमवायटी आदेश जारी केल्यानंतर एप्रिल २०१४मध्ये देण्यात आली होती.

- एमएसईटीसीएल नागोठणे आणि आरइन्फ्रा आरे यांच्यामधील २२० केव्ही एचव्हीडीसी (व्हीएससीवर आधारित) जोडणी - कन्सल्टन्सी

आरइन्फ्रा-टीला वरील योजनेसाठी तत्त्वतः मान्यता मिळालेली आहे. सदर डीपीआर प्रणालीचा अभ्यास करून तंत्रज्ञानाची निवड, रचना आणि डीपीआरची लीलावाची प्रक्रिया यांमध्ये मदत करण्यासाठी सल्लागार संस्था नेमण्यासाठी आहे. माननीय आयोगाने ह्या सल्लागार संस्थेचे डीपीआर मुख्य एचव्हीडीसी योजनेबरोबर जोडलेले आहे, हे उघड आहे. आरइन्फ्रा-टीचे म्हणणे असे आहे की, कन्सल्टन्सीला देण्यासाठीचे पैसे आ.व. १४-१५ आणि आ.व. १५-१६ मध्ये देण्याची आवश्यकता आहे आणि त्यानुसार भांडवली खर्च सदरच्या आर्थिक वर्षात विचारात घेऊन मुख्य एचव्हीडीसी योजनेचा एक भाग म्हणून समाविष्ट केलेला आहे.

### ५.१.१ भांडवलीकरणाचे भाकीत

वर म्हटल्यानुसार आरइन्फ्रा-टी खाली दर्शविल्यानुसार आ.व. १४-१५मध्ये मालमत्तेचे भांडवलीकरण करण्याचे प्रस्तावित करीत आहे. शिवाय, आ.व. १४-१५साठीचे अंदाज पहिल्या सहामाहीसाठी तात्पुरते वास्तविक विचारात घेतल्यानंतरचे आहेत.

वरील चर्चेवर आधारित आ.व. १४-१५साठी भांडवलीकरणाचा सारांश खालीलप्रमाणे आहे:

**तक्ता ७: सारांश - भांडवली खर्च आणि भांडवलीकरण**

| कोटी रु. | | अंदाज | एमवायटी आदेश |
|---|---|---|---|
| भांडवली खर्च | डीपीआर | १७३.६८ | |
| | बिगर-डीपीआर | ४.०० | |
| | **एकूण** | **१७७.६८** | **-** |
| भांडवलीकरण | डीपीआर | ३०.५९ | २३०.६१ |
| | बिगर-डीपीआर | २.१९ | १२.०० |
| | **एकूण** | **३२.७८** | **२४२.६१** |

### ५.१.२ अर्थसहाय्याची योजना

भांडवली खर्चासाठी कर्ज घेण्याची योजना अगोदरच्या विभागामध्ये आधीच स्पष्ट करण्यात आलेली आहे. स्टेट बँक ऑफ हैद्राबादने (एसबीएच) नियंत्रण कालावधीसाठी १०० कोटी रुपयांचे कर्ज मंजूर केल्यानुसार आरइन्फ्रा-टीने या आधीच आ.व. १४-१५च्या सुरुवातीस ७० कोटी रुपये काढलेले आहेत आणि आ.व. १४-१५मध्ये पुढे जात त्यांनी आर्थिक वर्षाच्या पहिल्या सहामाहीत स्टेट बँक ऑफ हैद्राबादकडून १५ कोटी रुपये काढलेले आहेत. आरइन्फ्रा-टी यापुढे आ.व. १४-१५च्या दुसऱ्या सहामाहीत ७.९४ कोटी रुपये काढण्याचे योजीत आहे आणि उर्वरित रक्कम आ.व. १५-१६मध्ये काढली जाईल. कर्जाची ही रक्कम आ.व. १४-१५ आणि आ.व. १५-१६मध्ये भांडवली खर्चासाठी वापरलेले आहेत.

### ५.१.३ कर्जाऊ भांडवलावरील व्याज

या अगोदरच्या विभागात स्पष्ट केल्यानुसार आ.व. १४-१५ साठी वेटेड सरासरी व्याजदर आरइन्फ्रा-टीचा वास्तविक डेट पोर्टफोलिओचा उपयोग करून निश्चित करण्यात आलेला आहे व त्यासाठी सर्व वास्तविक कर्जे आणि त्यांना लागू असलेले संबंधित व्याजदर आणि व्याजाच्या आणि मुदलीच्या परतफेडीचे वेळापत्रक विचारात घेतलेले आहे. अशा प्रकारे निश्चित करण्यात आलेला व्याजदर त्यानंतर नमुनेदार कर्जाच्या उर्वरित रकमेवर (प्रदान केलेल्या रकमेएवढा घसारा विचारात घेऊन), वार्षिम महसुलाच्या आवश्यकतेत आकारण्यासाठी व्याज निश्चित करण्यासाठी, एमवायटी नियमावली, २०११ नुसार लागू केले जाते.

### ५.१.४ घसारा

आ.व. १४-१५मध्ये भर घातलेल्या मालमत्ता ह्या आ.व. १४-१५च्या पहिल्या सहामाहीत प्रत्यक्षात भर घातलेल्या मालमत्ता आणि आ.व. १४-१५च्या दुसऱ्या सहामाहीत भर पडण्याची शक्यता असलेल्या मालमत्ता विचारात घेऊन दर्शविलेल्या आहेत. आ.व. १४-१५च्या दुसऱ्या तिमाहीत मालमत्तेच्या वर्गनिहाय विभाणीनुसार पडलेली भर ही आ.व. १४-१५च्या पहिल्या तिमाहीत पडलेल्या भरीची विभागणीच्या समप्रमाणात विचारात घेतलेली आहे.

घसाऱ्याची गणना एमवायटी नियमावली, २०११च्या विनियम ३१ अनुसार केलेली आहे. आ.व. १४-१५च्या पहिल्या सहमाहीत भर घातलेल्या मालमत्तेवर वास्तविक दिवसांची संख्या विचारात घेऊन घसाऱ्याची गणना केलेली

आहे. आ.व १४-१५च्या दुसऱ्या सहामाहीत मालमत्तेत अंदाजे जी भर पडणार होती, त्यावरील घसारा अशा वर्षाच्या मध्यावर (म्हणजेच डिसेंबर २०१४) जोडलेली मालमत्ता लक्षात घेऊन गणला गेला आहे.

### ५.१.५ इक्विटीवरील परतावा

आ.व. १४-१५साठी इक्विटीवरील परताव्याची गणना एमवायटी नियमावली, २०११मधील विनियम ३२.२ च्या आधारे, म्हणजेच वर्षाच्या सुरुवातीच्या समभाग भांडवलावर १५.५% अधिक वर्षभरात भांडवलीकरण केलेल्या मालमत्तेच्या ५०% हिश्श्यावर केलेली आहे. आरइन्फ्रा-टी असे सांगू इच्छिते की, ते आ.व. १४-१५मध्ये कोणतीही मालमत्ता सेवेतून बाद करण्याचे प्रस्तावित करीत नाही.

### ५.२ प्रचालन आणि देखभाल (ओ अँड एम) खर्च

आ.व. १४-१५साठी आरइन्फ्रा-टीने प्रचालन आणि देखभाल खर्चाचे भाकीत एमवायटी नियमाली, २०११मध्ये तरतूद केल्यानुसार केलले आहे (विनियम ६१.५), जे बेज्‌ची संख्या आणि वाहिन्यांची लांबी यावर अवलंबून आहे, जे आ.व. १४-१५च्या दरम्यान केलेल्या भांडवलीकरणावर आधारित आहेत.

### ५.२.१ प्रचालनाशी संबंधित अतिरिक्त खर्च

सध्याच्या या याचिकेत आरइन्फ्रा-टीने वास्तविक खर्चाचा दावा आ.व. १२-१३ आणि १३-१४ साठीचे एससीएडीए आकार, जमीन वापर आकार आणि ऊर्जा आकार यांच्या अंतर्गत केलेले आहे.

आ.व. १४-१५साठी ह्या खर्चांचा दावा पुढीलप्रमाणे करण्यात आलेला आहे:

- एससीएडीए आकार: आ.व. १४-१५च्या पहिल्या सहामाहीसाठीचे वास्तविक आकार याआधीच ''आ.व. १२-१३ साठी ट्रुईंग अप'' मधील संबंधित विभागात स्पष्ट केल्यानुसार हिशेबात घेतलेले आहेत. आ.व १४-१५च्या दुसऱ्या सहामाहीसाठी पहिल्या सहामाहीचे वास्तविक आकार विचारात घेऊन अशा प्रकारे आ.व. १४-१५साठीचे एकूण आकार गणलेले आहेत.

- जमीन वापर आकार: ट्रुईंग अप विभागात याआधीच स्पष्ट केल्यानुसार, एमओएमच्या आधारे, जमीन वापर आकार हे प्रचालन आणि देखभाल खर्चाचा अतिरिक्त हिस्सा म्हणून दावा केलेले आहेत.

- ऊर्जा आकार: आ.व. १४-१५च्या पहिल्या सहामाहीचे वास्तविक आकार आरइन्फ्रा-टीला प्राप्त झालेल्या मासिक देयकांच्या आधारावर आहेत. आ.व. १४-१५च्या दुसऱ्या सहामाहीसाठी पहिल्या सहामाहीतील वास्तविक आकार विचारात घेऊन अशा प्रकारे आ.व. १४-१५साठी एकूण ऊर्जा आकारांचे भाकीत केलेले आहे.

### ५.२.२ कॉर्पोरेट ॲलोकेशन

आ.व. १२-१३ आणि आ.व. १३-१४च्या ट्रुईंग अप प्रकरणात स्पष्ट केल्यानुसार, आरइन्फ्रा-टीसाठीचे मापदंड कॉर्पोरेट ॲलोकेशनपुरता विचार करता कमी दर्शविलेले आहेत. म्हणून कॉर्पोरेट ॲलोकेशनचा विचार स्वतंत्रपणे, नमुनेदार ॲलोकेशनपेक्षा वेगळा केलेला आहे. कॉर्पोरेट ॲलोकेशनासाठीच्या खर्चाचा अंदाज लावण्यासाठी आ.व. १४-१५मधील पहिल्या सहामाहीची वास्तविक आकडेवारी दुप्पट करून संपूर्ण वर्षासाठीच्या नमुनेदार ॲलोकेशनसाठी उपयोगात आणलेली आहे.

वरील चर्चेवर आधारित, आ.व. १४-१५साठीच्या प्रचालन आणि देखभाल खर्चाचे भाकीत विभागून ते नमुनेदार अलावन्स आणि अतिरिक्त खर्चांचे भाकीत असे वर चर्चा केल्यानुसार खालील तक्त्यात दर्शविलेले आहेत.

**तक्ता ८: प्रचालन आणि देखभाल खर्च**

| **आ.व. १४-१५साठी प्रचालन आणि देखभाल खर्च** | **अंदाज (कोटी रु.)** | **एमवायटी आदेश (कोटी रु.)** |
|---|---:|---:|
| नमुनेदार अलावन्स | ४०.९० | ४२.०९ |
| एससीएडीए आकार | १.०६ | १.४६ |
| जमीन वापर आकार | ३.६८ | ६.९१ |
| ऊर्जा आकार | ४.१५ | ३.४१ |
| केबल टाकण्यासाठी भाडे | - | १७.९० |
| कॉर्पोरेट ॲलोकेशन | २.२७ | - |
| **एकूण** | **५२.०५** | **७१.७७** |

### ५.३ खेळत्या भांडवलावरील व्याज

आ.व. १४-१५साठी खेळत्या भांडवलाच्या आवश्यकतेची गणना एमवायटी नियमावली, २०११च्या विनियम ३५.२ नुसार केली गेलेली आहे.

विनियम ३५.२ (ब)मध्ये खेळत्या भांडवलावरील व्याजदर हा, ज्या तारखेस दरपत्रक निश्चित करण्यासाठी अर्ज केलेला असेल, त्या तारखेसअसलेल्या भारतीय स्टेट बँकेच्या स्टेट बँक ॲडव्हान्स रेट (एसबीएआर) असावा अशी तरतूद आहे. अर्ज सादर करण्याच्या तारखेचा एसबीएआर १४.७५% असल्याने, खेळत्या भांडवलावरील व्याजाची गणना करण्यासाठी तोच विचारात घेतलेला आहे.

### ५.४ आकस्मिकता राखीव निधीसाठी वर्गणी

एमवायटी नियमावली, २०११मध्ये आकस्मिकता राखीव निधीसाठीची (सीआर) तरतूद सुरुवातीच्या जीएफएच्या ०.२५% एवढी आहे. सुरुवातीच्या जीएफएवर आधारित आ.व. १४-१५साठी तेवढाच विचारात घेतलेला आहे.

### ५.५ आयकर

एमवायटी नियमावली, २०११मधील विनियम ३१ अनुसार आ.व. १३-१४साठी देय असलेला वास्तविक आयकर हा या याचिकेत गेल्या वर्षासाठी ट्रुईंग अप हाती घेण्यात येणार असल्याने, आ.व. १४-१५साठीचा आयकर या याचिकेत आ.व. १३-१४साठी विचारात घेतलेल्या आयकराएवढाच आहे.

### ५.६ आ.व. १४-१५साठी महसूल

#### ५.६.१ आंतरराज्य पारेषणातून महसूल

माननीय आयोगाने २०१३च्या प्रकरण क्र. ५६मध्ये दिनांक १३ मे २०१३ रोजी दिलेल्या आदेशात आ.व. १४-१५साठीच्या आंतरराज्य पारेषण प्रणालीतून मिळणाऱ्या महसुलाला १ एप्रिल २०१४पासून मान्यता दिलेली आहे, त्यानुसार आरइन्फ्रा-टीला दरवर्षी ३२६.१५ कोटी रुपये, म्हणजेच दरमहा २७.१८ कोटी रुपये प्राप्त होतील.

आ.व. १४-१५साठी माननीय आयोगाने २०१४च्या प्रकरण क्र. १२३मध्ये दिनांक १४ ऑगस्ट २०१४ रोजी दिलेल्या आदेशात आ.व. १४-१५साठीच्या आंरराज्य पारेषण प्रणालीतून मिळणाऱ्या महसुलाला दिनांक १ सप्टेंबर २०१४पासून मान्यता दिलेली आहे, त्यानुसार आरइन्फ्रा-टीला दरवर्षी ३११.१८ कोटी रुपये, म्हणजेच दरमहा २५.९३ कोटी रुपये प्राप्त होतील. अशा प्रकारे, पारेषण आकारांपासून मिळणारा महसूल ३१७.४२ कोटी रुपये एवढा विचारात घेतलेला आहे.

#### ५.६.२ दरपत्रकाव्यतिरिक्तचे उत्पन्न

आ.व. १४-१५साठी दरपत्रकाव्यतिरिक्तच्या मुख्य शीर्षकांचे अंदाज खाली स्पष्ट केलेले आहेत:

- जमिनीच्या वापरासाठीच्या भाड्यापासून मिळणारे उत्पन्न: आरइन्फ्रा-टी आणि आरइन्फ्रा-डी यांच्यात झालेल्या एमओएमच्या आधारे, आरइन्फ्रा-डीकडून प्राप्त झालेले उत्पन्न एनटीआय म्हणून विचारात घेतलेले आहे.
- कर्मचाऱ्यांना दिलेल्या कर्जावरील आणि अग्रीमावरील व्याज: कर्मचाऱ्यांना दिलेल्या कर्जावरील आणि अग्रीमावरील व्याजात आ.व. १२-१३ आणि आ.व. १३-१४मध्ये खूप मोठी वाढ झालेली नसल्याने त्याचाच विचार आ.व. १४-१५साठीही करण्यात आलेला आहे.
- आकस्मिकता राखीव निधीच्या गुंतवणुकीवरील व्याज: आकस्मिकता राखीव निधीच्या गुंतवणुकाही भारत सरकारच्या सेक्युरिटिज्‌मध्ये कराव्या लागतात आणि त्यानुसारच व्याजाची गणना केलेली आहे.

#### ५.६.३ इतर व्यवसायांपासूनचे उत्पन्न

या याचिकेत आधीच विस्तृतपणे म्हटल्याप्रमाणे आरइन्फ्रा-टीला आ.व. १३-१४मध्ये ०.११ कोटी रुपये उत्पन्न प्राप्त झाले. तेच उत्पन्न आ.व. १४-१५साठीही विचारात घेतलेले आहे. एमवायटी नियमावलीच्या विनियम ६३.१ नुसार आरइन्फ्रा-टीने इतर व्यवसायापासून मिळालेल्या रकमेपैकी १/३ रक्कम विचारात घेतलेली आहे.

### ५.७ आ.व. १४-१५साठी महसुलातील तात्पुरती तफावत/अधिक्य

आ.व. १४-१५साठी महसुलातील तात्पुरती तफावत/अधिक्याची गणना आंतरराज्य पारेषण प्रणालीतून मिळालेला महसूल आणि महसुलाची एकत्रित आवश्यकता (दरपत्रकाव्यतिरिक्तचे उत्पन्न आणि इतर व्यवसायापासूनचे उत्पन्न वजा जाता) यांची तुलना करून केलेली आहे.

आ.व. १४-१५ साठीच्या वार्षिक महसुलाच्या आवश्यकतेचा सारांश पुढे तक्त्याच्या रूपाने दिलेली आहे:

**तक्ता ९: आ.व. १४-१५साठी तात्पुरती महसुली तफावत/अधिक्य**

| अ.क्र. | तपशील (कोटी रु.) | अंदाज | एमवायटी आदेश | फरक |
|---|---|---|---|---|
| | **खर्च** | | | |
| १ | प्रचालन आणि देखभाल खर्च | ५२.०५ | ७१.७७ | (१९.७२) |
| २ | दीर्घकालीन कर्जाऊ भांडवलावरील व्याज | ७३.६५ | ७३.७८ | (०.१३) |
| ३ | घसारा | ५९.८३ | ७५.८२ | (१५.९९) |
| ४ | इक्विटीवरील परतावा | ७२.२५ | ८८.६३ | (१६.३८) |
| ५ | खेळत्या भांडवलावरील व्याज | ६.९३ | ७.०९ | (०.१६) |
| ६ | आकस्मिकता राखीव निधीसाठी वर्गणी | ३.५० | ४.१२ | (०.६२) |
| ७ | आयकर | १.०१ | - | १.०१ |
| **अ** | **एकूण खर्च** | **२६९.२३** | **३२१.२२** | **(५१.९८)** |
| | **इतर आंतरराज्य पारेषण प्रणालीतून महसूल** | | | |
| ८ | दरपत्रकाव्यतिरिक्तचे उत्पन्न | २.३२ | २.९९ | (०.६७) |
| ९ | इतर व्यवसायांपासूनचे उत्पन्न | ०.०४ | - | ०.०४ |
| **ब** | **एकूण महसूल** | **२.३६** | **२.९९** | **(०.६३)** |
| क | महसूल (तूट)/अधिक्य = (ब-अ) | (२६६.८७) | (३१८.२३) | ५१.३५ |
| ड | आंतरराज्य पारेषण प्रणालीतून महसूल | ३१७.४२ | ३१८.२३ | (०.८०) |
| **ई** | **निव्वळ महसूल (तफावत)/अधिक्य=(ड+क)** | **५०.५५** | **-** | **५०.५५** |

आ.व. १४-१५साठी महसुलातील तफावत/अधिक्य आ.व. १५-१६साठीच्या वार्षिक महसुलाच्या आवश्यकतेत जोडलेले आहे.

## ६. आ.व. १५-१६साठी वार्षिक महसुलाची आवश्यकता

या विभागात आरइन्फ्रा-टी गेल्या कालावधीतील वास्तविक कामगिरी आणि तिचा येणाऱ्या वर्षावर होणारा परिणाम यांच्या आधारे आ.व. १५-१६साठी वार्षिक महसुलाची आवश्यकता सादर करीत आहे. आरइन्फ्रा-टी माननीय आयोगाने आ.व.१५-१६साठीच्या सुधारित वार्षिक महसुलाच्या आवश्यकतेला मान्यता द्यावी अशी विनंती करीत आहे.

### ६.१ भांडवल गुंतवणूक योजना

या आधीच्या प्रकरणात आधीच स्पष्ट केल्यानुसार, विलंब झालेले बहुसंख्य भांडवली खर्च हे ईएचव्ही केंद्रांना कार्यान्वित करण्याच्या योजनेशी संबंधित होते, ज्यांची फक्त सिव्हिल कामे बाकी आहेत, जी आ.व. १४-१५

आणि आ.व. १५-१६मध्ये टप्प्याटप्प्याने करावयाची आहेत. त्यानुसार, ज्या सर्व डीपीआर योजना (एकूण ८) एमवायटी आदेशानुसार आधी आ.व. १३-१४मध्ये पूर्ण करण्याचे योजले होते, त्या आ.व. १५-१६मध्ये पूर्ण करण्याची आरइन्फ्रा-टीची योजना आहे. त्यानंतर, आधी स्पष्ट केल्यानुसार, उर्वरित चार ईव्हीएचसाठी, जमिनीच्या उपलब्धतेशी संबंधित काही समस्या आहेत, ज्यांचा पाठपुरावा आरइन्फ्रा-टी विविध पातळ्यांवर करीत आहे. जमिनीशी संबंधित या समस्या लवकरच सुटतील अशी आरइन्फ्रा-टीला अपेक्षा आहे आणि त्यानुसार या योजनांसाठी आ.व. १५-१६साठी भांडवली खर्चाचे नियोजन केलेले आहे. त्याव्यतिरिक्त, ज्या योजना एमवायटी आदेशाचा भाग नव्हत्या, त्यांच्यासाठीही खर्चाचे नियोजन केलेले आहे, परंतु त्यांना एकतर त्यानंतर मंजुरी दिली गेली किंवा त्यानंतर त्या आरइन्फ्रा-टीने मान्यतेसाठी सादर केल्या होत्या.

### ६.१.१ भांडवलीकरणाचे भाकीत

वर म्हटल्यानुसार, आरइन्फ्रा-टी खाली दर्शविल्यानुसार आ.व. १५-१६मध्ये मालमत्तेचे भांडवलीकरण करण्याचे प्रस्तावित करीत आहे.

वरील चर्चेवर आधारित आ.व. १५-१६साठीच्या भांडवलीकरणाचा सारांश खाली दिल्यानुसार आहे:

**तक्ता १०: सारांश - भांडवली खर्च आणि भांडवलीकरण**

| **कोटी रु.** | | **अंदाज** | **एमवायटी आदेश** |
|---|---|---|---|
| भांडवली खर्च | डीपीआर | ४०२.०५ | |
| | बिगर-डीपीआर | २०.०० | |
| | **एकूण** | **४२२.०५** | **-** |
| भांडवलीकरण | डीपीआर | १४६.०३ | ७२९.०८ |
| | बिगर-डीपीआर | २१.२६ | १२.०० |
| | **एकूण** | **१६७.२९** | **७४१.०८** |

### ६.१.२ अर्थसहाय्याची योजना

आ.व. १५-१६साठीचे अर्थसहाय्य स्टेट बँक ऑफ हैद्राबादकडील उपयोगात आणण्यासाठी शिल्लक असलेले कर्जामधून केले जाईल आणि उर्वरित निधी ७०:३० या भांडवलाच्या रचनेंतर्गत नमुनेदार कर्जातून (नॉरमॅटिव्ह डेट) केले जाईल.

### ६.१.३ कर्जाऊ भांडवलावरील व्याज

आ.व. १४-१५मधील कर्जाच्या कालावधीनुसार वास्तविक परतफेडीचे वेळापत्रक लक्षात घेऊन आ.व. १५-१६च्या सुरुवातीला शिल्लक असलेले कर्ज आणि ऑक्टोबरच्या शेवटी लागू असलेला व्याजदर वेटेड सरासरी व्याजदर गणण्यासाठी विचारात घेतलेला आहे.

एमवायटी नियमालवली, २०११ नुसार वार्षिक महसुलाच्या आवश्यकतेसाठी व्याजदर निश्चित करण्यासाठी अशा प्रकारे निश्चित करण्यात आलेला व्याजदर त्यानंतर शिल्लक नमुनेदार कर्जावर लागू करण्यात आलेला आहे (घसाऱ्याएवढी परतफेड विचारात घेऊन).

### ६.१.४ घसारा

आ.व. १५-१६मध्ये मालमत्तेत पडणारी भर ही आ.व. १४-१५मध्ये पडलेल्या भरीएवढी विचारात घेतलेली आहे. घसाऱ्याची गणना एमवायटी नियमावली, २०११च्या विनियम ३१ नुसार केलेली आहे. नव्याने भर घातलेल्या मालमत्तेवरील घसाऱ्याची गणना आ.व. १५-१६च्या मध्यावर पडलेली भर विचारात घेऊन केलेली आहे.

### ६.१.५ इक्विटीवरील परतावा

आ.व. १५-१६साठी इक्विटीवरील परताव्याची गणना एमवायटी नियमावली, २०११च्या विनियम ३२.२वर आधारित, म्हणजेच समभाग भांडवलावर १५.५% दराने अधिक वर्षभरात भांडवलीकरण केलेल्या मालमत्तेच्या ५०% इक्विटी पोर्शनएवढी केलेली आहे. आरइन्फ्रा असे सांगू इच्छिते की, ते आ.व. १५-१६मध्ये कोणत्याही मालमत्ता सेवेतून बाद करावयाचे प्रस्तावित करीत नाहीत.

### ६.२ प्रचालन आणि देखभाल (ओ अँड एम) खर्च

आ. व. १५-१६साठी प्रचालन आणि देखभाल खर्चाचे भाकीत आरइन्फ्रा-टीने एमवायटी नियमावली, २०११मध्ये दिलेल्या मापदंडांनुसार (विनियम ६१.५), बेज्ची संख्या आणि वाहिन्यांची लांबी यांच्यावर केलेले आहे, जे आ.व. १५-१६च्या भांडवलीकरणाच्या भाकितावर आधारित गणलेले आहेत.

### ६.२.१ प्रचालनाशी संबंधित अतिरिक्त खर्च

आ.व. १४-१५शी संबंधित वार्षिक कामगिरीचे पुनरावलोकन या प्रकरणात स्पष्ट केल्यानुसार, ह्या खर्चांचा दावा आ.व. १५-१६मध्ये पुढीलप्रमाणे केलेला आहे.

- एससीएडीए आकार: स्काडा खर्च हे कर्मचारी, प्रशासन आणि सामान्य तसेच दुरुस्ती आणि देखभाल खर्च यांच्याशी संबंधित असतो. म्हणून स्काडाशी संबंधित खर्चांचे भाकीत करण्यासाठी कर्मचारी, प्रशासन आणि सामान्य तसेच दुरुस्ती आणि देखभाल खर्च यांच्याशी संबंधित खर्च हे आ.व. १४-१५मधील अंदाजित रकमेतील वाढलेल्या घटकांनुसार वाढलेले दाखविलेले आहेत आणि त्यानंतर आ.व. १५-१६साठीच्या स्काडा खर्चांची गणना करण्यासाठी त्यात जोडलेले आहेत. यासाठी कर्मचाऱ्यांशी संबंधित खर्चासाठी सीपीआयचा उपयोग केलेला आहे, प्रशासकीय आणि सामान्य खर्चासाठी ६०% सीपीआय आणि ४०% डब्ल्यूपीआयचा वापर केलेला आहे आणि दुरुस्ती आणि देखभाल खर्चासाठी डब्ल्यूपीआयचा वापर करण्यात आलेला आहे. सप्टेंबर २००९ ते ऑगस्ट २०१४ या कालावधीसाठीचा सीपीआय आणि डब्ल्यूपीआय डेटा वापरून सरासरी तेजीचे निर्देशांक निश्चित केलेले आहेत.

- जमीन वापर आकार: ट्रुईंग अप विभागात याआधीच स्पष्ट केल्यानुसार, जमिनीच्या वापराचे आकार हे एमओएमच्या आधारे अतिरिक्त प्रचालन आणि देखभाल खर्चाचा एक भाग म्हणून दावा केलेले आहेत.
- ऊर्जा वापर आकार: आरइन्फ्रा-टीच्या इन्स्टॉलेशनच्या विजेच्या खपावर आणि माननीय आयोगय आ.व. १५-१६साठी ज्या आरइन्फ्रा-टीच्या दरपत्रकाला मान्यता देईल, त्यावर ऊर्जा आकार अवलंबून असतात. आरइन्फ्रा-टीला यांचे भाकीत करणे शक्य नसल्याने, आ.व. १५-१६साठीचे ऊर्जा आकार आ.व. १४-१५साठी होते, त्याप्रमाणेच विचारात घेतलेले आहेत.

### ६.२.२ कॉर्पोरेट अलोकेशन

आ.व. १५-१६साठीच्या कॉर्पोरेट खर्चांचे भाकीतही वर स्पष्ट केलेल्या तेजीच्या घटकांचा वापर करून केलेले आहे आणि आ.व. १४-१५च्या कॉर्पोरेट खर्चांच्या अंदाजांवर आधारित लागू केलेले आहेत.

वरील चर्चेच्या आधारे, आ.व. १५-१६साठीच्या प्रचालन आणि देखभाल खर्चांचे भाकिताची वर्गवारी नॉरमॅटिव्ह अलावन्स आणि वर चर्चा केल्यानुसार अतिरिक्त खर्चांचा अंदाज यानुसार करून ते खालील तक्त्यात दर्शविलेले आहेत:

**तक्ता ११: प्रचालन आणि देखभाल खर्च**

| अ.वा. १५-१६ साठी प्रचालन आणि देखभाल खर्च | अंदाज (कोटी रु.) | एमवायटी आदेश (कोटी रु.) |
|---|---|---|
| नॉरमॅटिव्ह अलावन्स | ४३.२२ | ५२.३९ |
| स्काडा आकार | १.१६ | १.५९ |
| जमीन वापर आकार | ३.८६ | ६.९१ |
| ऊर्जा आकार | ४.१५ | ३.५८ |
| केबल टाकण्यासाठी भाडे | - | १७.९० |
| कॉर्पोरेट ॲलोकेशन | २.४८ | - |
| **एकूण** | **५४.८७** | **८२.३७** |

### ६.३ खेळत्या भांडवलावरील व्याज

आ.व. १५-१६साठी खेळत्या भांडवलाची आवश्यकता एमवायटी नियमावली २०११च्या विनियम ३५.२नुसार गणली गेलेली आहे.

आ.व. १५-१६साठी पारेषण आकारापासून मिळालेल्या महसुलाच्या बाबतीत, माननीय आयोगाने २०१४च्या प्रकरण क्र.१२३मध्ये दिनांक १४ ऑगस्ट २०१४ रोजी दिलेल्या आदेशात ३९९.७५ कोटी रुपये एवढ्या आंतरराज्य पारेषण प्रणाली दरपत्रकाला आ.व. १५-१६साठी मान्यता दिलेली आहे, त्यानुसार आरइन्फ्रा-टीला दरमहा ३३.३१ कोटी रुपये प्राप्त होतील. तथापि, या याचिकेसाठी आरइन्फ्रा-टी पारेषण आकारातून प्राप्त होणारा महसूल आ.व.

१५-१६साठी अंदाजित वार्षिक महसुलाच्या आवश्यकतेनुसारच विचारात घेत आहे, ज्यात आ.व. १२-१३ , आ.व. १३-१४ आणि आ.व. १४-१५च्या परिणामस्वरूपी तफावतीचा/अधिक्याचा समावेश आहे.

एमवायटी नियमावलीच्या विनियम ३५.२ (ब) नुसार, याचिका दाखल करण्याच्या वेळी प्रचलित एसबीएआर १४.७५% असल्याने, तेवढाच दर खेळत्या भांडवलावरील व्याजाची गणना करण्यासाठी विचारात घेतलेला आहे.

### ६.४ आकस्मिकता राखीव निधीसाठी वर्गणी

आकस्मिकता राखीव निधीसाठी वर्गणीची गणना एमवायटी नियमावली, २०११अनुसार, म्हणजेच सुरुवातीच्या जीएफएच्या ०.२५% एवढी केलेली आहे. सुरुवातीच्या जीएफएवर आधारित तीच आ.व. १५-१६साठी विचारात घेण्यात आलेली आहे.

### ६.५ आयकर

एमवायटी नियमावली २०११मधील विनियम ३१ नुसार, आ.व. १३-१४मध्ये प्रदान केलेल्या वास्तविक आयकराच्या आधारे, हे वर्ष म्हणजे या याचिकेत ज्यासाठी ट्रुईंग अप हाती घेतले जाणार आहे, ते वर्ष असल्याने, आ.व. १५-१६साठी दावा तात्पुरत्या स्वरूपात केलेला आयकर हा आ.व. १३-१४साठी या याचिकेत विचारात घेतलेल्या आयकराएवढाच आहे.

### ६.६ आ.व. १५-१६साठी महसूल

#### ६.६.१ दरपत्रकाव्यतिरिक्तचे उत्पन्न

आ.व. १५-१६साठी ज्यांच्यासाठी दरपत्रकाव्यतिरिक्तच्या उत्पन्नाचे भाकीत करण्यात आलेले आहे, त्या शीर्षकांचे स्पष्टीकरण खाली दिलेले आहे:

- जमिनीच्या वापरापासून भाड्याचे मिळणारे उत्पन्न: आरइन्फ्रा-टी आणि आरइन्फ्रा-डी यांच्यामधील एमओएमनुसार आरइन्फ्रा-डीकडून मिळालेले उत्पन्न एनटीआय म्हणून विचारात घेतले जाते.
- कर्मचाऱ्यांना दिलेल्या कर्जावरील आणि अग्रीमावरील व्याज: आ.व. १५-१६साठी ही रक्कम आ.व. १४-१५ एवढीच विचारात घेतलेली आहे.
- आकस्मिकता राखीव निधीसाठी गुंतवणुकांवरील व्याज: आकस्मिकता राखीव निधीसाठीची गुंतवणूक भारत सरकारच्या सेक्युरिटिज्मध्ये केली जाते आणि त्यानुसार व्याजाची गणना केली जाते.

#### ६.६.२ इतर व्यवसायांपासूनचे उत्पन्न

आ.व. १५-१६साठी ही रक्कम आ.व. १४-१५ प्रमाणेच समजण्यात आलेली आहे.

### ६.७ आ.व. १२-१३ आणि १३-१४ साठी महसुलातील तफावत/अधिक्य

आ.व. १२-१३ आणि १३-१४ साठी महसुलातील तफावत/अधिक्य व त्यासोबत कॅरिंग कॉस्ट आ.व. १५-१६च्या वार्षिक महसुलाच्या आवश्यकतेत समाविष्ट केलेले आहे. याचा एकूण परिणाम पुढीलप्रमाणे आहे:

**तक्ता १२: आ.व. १२-१३ आणि १३-१४च्या तफावतीचा/अधिक्याचा परिणाम.**

| तपशील (कोटी रु.) | आव १२-१३ | आव १३-१४ | आव १४-१५ | आव १५-१६ |
|---|---|---|---|---|
| आदेशानुसारमहसुलातील तफावत/(अधिक्य) | ८४.७९ | | | |
| अंतर्गत महसुलातील तफावत/(अधिक्य) | ८.५४ | | | |
| महसुलातील एकूण तफावत/(अधिक्य) | ९३.३३ | (०.०९) | | |
| एसबीआय पीएलआर | १४.७५% | १४.४५% | १४.७५% | १४.७५% |
| | | | | |
| आ.व. १२-१३साठी आदेशानुसारमहसुलातील तफावत/(अधिक्य) | | ८४.७९ | | |
| वरीलसाठी अर्ध्या वर्षासाठी कॅरिंग कॉस्ट | | ६.१३ | | |
| | | | | |
| सुरुवातीची शिल्लक | - | १५.४२ | १४.५२ | १६.६६ |
| वर्षभरात जोडलेले | ९३.३३ | (८.६३) | - | - |
| **शेवटची शिल्लक** | **९३.३३** | **६.७९** | **१४.५२** | **१६.६६** |
| | | | | |
| ओपनिंगवर कॅरिंग कॉस्य | - | २.२३ | २.१४ | १.२३ |
| घातलेल्या भरीवर कॅरिंग कॉस्ट | ६.८८ | ५.५० | - | - |
| **एकूण कॅरिंग कॉस्ट** | **६.८८** | **७.७३** | **२.१४** | **१.२३** |
| **कॅरिंग कॉस्टसहित एकूण परिणाम** | | | | **१७.८९** |

## ६.८ वार्षिक महसुलाची आवश्यकता

वर वर्णन केलेल्या वेगवेगळ्या घटकांवर आधारित, आ.व. १५-१६साठीची वार्षिक महसुलाची आवश्यकता पुढे वर्तविल्यानुसार आहे:

**तक्ता १३: आ.व. १५-१६साठी वार्षिक महसुलाची आवश्यकता**

| अ.क्र. | तपशील (कोटी रु.) | अंदाज | एमवायटी आदेश | फरक |
|---|---|---|---|---|
| | **खर्च** | | | |
| १ | प्रचालन आणि देखभाल खर्च | ५४.८७ | ८२.३७ | (२७.५०) |
| २ | दीर्घकालीन कर्जाऊ भांडवलावरील व्याज | ७४.८८ | ९६.३२ | (२१.४४) |
| ३ | घसारा | ६४.७२ | ९९.५२ | (३४.८०) |

| **अ.क्र.** | **तपशील (कोटी रु.)** | **अंदाज** | **एमवायटी आदेश** | **फरक** |
|---|---|---|---|---|
| ४ | इक्विटीवरील परतावा | ७६.९० | १११.५० | (३४.६०) |
| ५ | खेळत्या भांडवलावरील परतावा | ५.८४ | ८.७० | (२.८६) |
| ६ | आकस्मिकता राखीव निधीसाठी वर्गणी | ३.५८ | ४.७२ | (१.१४) |
| ७ | आयकर | १.०१ | - | १.०१ |
| **अ** | **एकूण खर्च** | **२८१.८०** | **४०३.१३** | **(१२१.३३)** |
| | **आंतरराज्य पारेषणापासून महसूल** | | | |
| ८ | दरपत्रकाव्यतिरिक्तचे उत्पन्न | २.६४ | ३.३७ | (०.७३) |
| ९ | इतर व्यवसायांपासूनचे उत्पन्न | ०.०४ | - | ०.०४ |
| **ब** | **एकूण महसूल** | **२.६७** | **३.३७** | **(०.७०)** |
| **क** | **आ.व. १५-१६साठी वार्षिक महसुलाची आवश्यकता (अ-ब)** | **२७९.१३** | **३९९.७६** | **(१२०.६४)** |
| ड | आ.व. १३-१४ पर्यंत महसुलातील संकलित तफावत | १७.८९ | - | १७.८९ |
| ई | एटीई निकालाचा परिणाम | १०.०४ | - | १०.०४ |
| फ | आ.व. १४-१५साठी महसुलातील तफावत / (अधिक्य) | (५०.५५) | - | (५०.५५) |
| **ग** | **निव्वळ वार्षिक महसुलाची आवश्यकता (क+ड +ई+फ)** | **२५६.५२** | **३९९.७६** | **(१४३.२६)** |

आ.व. १५-१६साठीच्या पारेषण दरपत्रकातून उपरोक्त वार्षिक महसुलाची आवश्यकता वसूल करण्यास मान्यता द्यावी अशी आरइन्फ्रा-टी माननीय आयोगाला विनंती करीत आहे.